

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. २८६०

विनायक डंके

BVBK-0402860

# राघोजीची सफर

उत्कंठावर्धक साहसकथा

●

लेखक
विनायक डंके

●

पुष्प प्रकाशन लिमिटेड, पुणे - ७

BVBK-0402860

**Raghojichi Safar**

**Vinayak Danke**

●

प्रकाशन क्र. ५०

●

प्रकाशक

**संजय सोनवणी**

व्यवस्थापकीय संचालक

पुष्प प्रकाशन लि.

पुणे ४११ ००७

●

मुद्रक

**वृंदा प्रिंटर्स**

६३५, सदाशिव पेठ, पुणे ३०

●

© प्रकाशकाधीन

●

प्रथमावृत्ती १९९३

●

मुखपृष्ठ

विनायक डंके

●

किंमत - पंचवीस रुपये मात्र

*विद्यार्थी व शिक्षण यांच्याचसाठी निरपेक्षपणे*
*राबणारे* ***प्राचार्य श्रीमान् हरिनाथजी पाण्डेय,***
*श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय,*
*यांना सविनय...*

— विनायक डंके

... शाखा.
२८६० ... ३०।१०।०३


# राघोजीची सफर

तशी ही खूपच जुनी गोष्ट आहे. माझ्या पूर्वजांपैकी कोणी तरी कधीतरी लिहून ठेवलेली. किमान शंभर वर्षापूर्वी अशीच घरातल्या माळ्यावरच्या जुन्या अडगळ सामानाची उलथापालथ करताना एका पेटाऱ्याच्या तळाशी एक जाडजूड वही होती. चांगल्या तांबड्या कातड्याचे मजबूत वेष्टण घातलेली. मी सहज चाळू लागलो. वहीतली पाने जीर्ण-शीर्ण झालेली होती. पिवळी पिवळी जरा धक्का लागला की तुकडा पडायचा, नाहीतर भुगा व्हायचा.

मी कितीतरी वेळ तसाच माळ्यावर वाचत बसलो होतो. अंधार पडू लागला तशी खालून आईची हाक आल्यावर उठलो. काखोटीला ते बाड होतंच. जोपर्यंत ते आत्मकथन वाचून पूर्ण होत नव्हते, तोपर्यंत कशात लक्ष लागणेच शक्य नव्हते. कसेबसे दोन घास खाल्ले आणि वर माझ्या खोलीत पळालो, रात्रभर जागून ते वाचन पूर्ण करायचेच ह्या विचाराने –

एक सांगायचे राहूनच गेलेय पूर्वापार, पिढ्यान् पिढ्या आमचं वास्तव्य समुद्र किनारी. समुद्र म्हणजे आमचा जिवलग. आमचं आयुष्य दर्यावर्दी. ज्या कोण्या पूर्वजानं हे जे काही लिहून ठेवलं आहे, ते ही एका अद्भुत समुद्र सफरीचंच वर्णन आहे. अगदी मतीगुंग करणारं, अनोखं! ह्या बाडाचा जो कोणी लेखक आहे... त्याचं नाव राघोजी. बाडाला नाव दिलयं – '**राघोजीची सफर**'–

# एक

समुद्र सफरींचं वेड माझ्या रक्तातच होतं. म्हणजे आजही आहेच ते. ते कधीच संपणार नाही. माझे वडील - आजोबा - आजोबांचे वडील - सगळे कुशल दर्यावर्दी होते. तसं माझं वय लहान होतं. त्यामुळे अद्याप तरी मला समुद्र सफरीचा आनंद उपभोगता आलेला नाही. पण ती संधी सुध्दा अचानकच चालून आली. माझी भटकंती सुरू झाली.

माझं खरं नाव राघोजी. पण माझी ही भटकवृत्ती पाहून घरातली मंडळी मला भटक्या म्हणूनच हाक मारीत. समुद्रावर भटकायला जाण्यापूर्वी मी ताडा-माडांच्या जंगलात, डोंगर-दऱ्यांमधून मनमुराद भटकत असे.

एके दिवशी कुठल्या तरी सफरीवरून माझे बाबा आले होते. खांद्यावरचे मासेमारीचं जाळं कोपऱ्यातल्या मेढीवर टांगता टांगता म्हणाले, "भटक्या, तुला समुद्र सफरीवर जायचंय का रे ?"

मी उडालोच - आनंदाने ओरडलोच, "म्हणजे काय ? नक्की जायचंय -"

"पण मी बरोबर येणार नाही. तुला

एकट्यालाच जावं लागेल - "

"माझी तयारी आहे - "

"मग लाग तयारीला - आज दुपारीच एक गलबत सुटणार आहे. प्रमुख कपितानाला मी सांगितलंय."

मधला वेळ कसा गेला ते कळलंच नाही. माझे डोळे दुपारकडे लागले होते. दुपारी माझे पाऊल त्या जहाजावर पडले. कपितानाच्या ताब्यात मला दिले आणि बाबा माघारी वळले.

त्या जहाजावर माझ्या सारखीच, समवयस्क मुलेही होती. सरळ आणि सुस्वभावी लगेच त्यांची आणि माझी मैत्री जुळली. सगळ्यात मीच छोटा असल्यामुळे ते मला बारक्या म्हणून हाक मारू लागले. मलाही ते नाव आवडले. आमचा प्रवास सुरू झाला. क्षणभर माझ्या अंत:करणात विलक्षण खळबळ माजली. आईची, बाबांची आठवण येत होती. समुद्र सफरी तशा रोमहर्षक खऱ्या, पण... पण... तेवढ्याच त्या धोकादायकही असतात. एखादा अपघात झाला की सगळेच संपले. पुन्हा कधी आपल्या आई - बाबांची भेट होईल ते सांगता येणार नाही. माझ्या डोळ्यांत अश्रू जमू लागले.

त्या जहाजाचे नाव 'गरूड' असे होते. घरातून बाहेर पडता पडता आईने मला सांगितले होते - "दिवसातून निदान एकदा तरी मनापासून परमेश्वराची प्रार्थना करीत जा. तो तुझे नक्कीच रक्षण करील."

आमच्या जहाजाने दक्षिण दिशा धरली होती.

महासागरातला हा माझा पहिलाच प्रवास होता!

• • •

# दोन

त्या दिवशी हवा अतिशय प्रसन्न अशी होती. आकाशातले स्वच्छ सूर्यकिरण पाण्यावर चांदीच्या रसाप्रमाणे चमचमत होते. एखाद दुसरा समुद्रपक्षी अन्नाच्या आशेने आमच्या जहाजाभोवती घिरट्या घालीत होता. जहाजाची पांढरी शिडे वाऱ्याने टम्म फुगली होती. मोठ्या आनंदाने जहाज निघाले होते. त्याचा तो डौल - दिमाख मी माझ्या मनात साठवून घेत होतो.

आपल्या खणखणीत आवाजात कपितान (कप्तान) आपल्या हाताखालच्या खलाशांना हुकूम देत होते. खलाशांची धावपळ सुरू होती. क्षणाक्षणाला आमचे जहाज किनाऱ्यापासून दूरदूर सरकत होते. माझे आई-बाबा असलेले घर, त्या सभोवती असलेली बाग - ते डोंगर, ती झाडी अधिकाधिक अस्पष्ट होत होती. मी विचित्र अवस्थेत जहाजाच्या कठड्याशी रेलून ते पाहात उभा होतो.

त्या जहाजावर मला दोन मस्त दोस्त मिळाले. त्यातला एक जगूजी हा होता, पण ताकदवान. वय असेल अठरा - एकोणीस. हसरा चेहरा, त्याच्या या अगोदरही काही

समुद्र - सफरी झालेल्या होत्या. त्यामुळे त्याचे समुद्री शिक्षण खूपच झालेले होते. वृत्तीने मोकळा-ढाकळा, सिंहासारखा शूर, अन् धाडसी ; पण मायाळूही तितकाच. जहाजांवरील सगळ्यांनाच तो फार आवडायचा. माझा दुसरा दोस्त म्हणजे - पिराजी. आम्ही राहात होतो. त्याच्या पलिकडच्या गावचा. चपळ, विनोदी पण खोडकर, वय चौदा वर्षे. पण त्याच्या खोड्यामुळे तो कुणाला दुखवायचा मात्र नाही. सगळ्यांचेच त्याच्यावर प्रेम होते , लोभ होता.

संध्याकाळ होत आली मी आपला माझ्याच तंद्रीत होतो. तसाच कठड्याशी रेलून. अचानक पाठीवर एक थाप पडली. मी दचकलो मागे वळून पाहिले - मागे जगूजी उभा होता - "अहो बारीकराव ! पुरे झालं सृष्टिसौंदर्य बघणं - चला आता खाली ; आपल्या दोघांना एकत्र राहायचंय. एकाच खोलीत पण मला मात्र तू आवडलास दोस्ता - मी तुला आवडलो कां ? "

मी फक्त हसलो. त्याचा हात हातात घेतला - तो ही हसला. पिराजीही आला त्याच क्षणापासून आम्ही तिघेही अगदी जीवश्चकंठश्च दोस्त बनलो.

इतर सर्वसाधारण जहाजांचा जसा समुद्रप्रवास होत असतो , तसाच , विशेष काहीही न घडता आमच्या जहाजाचा प्रवास सुरू होता. किरकोळ वादळी हवा , थोडाफार खवळलेला समुद्र ; एकदा मात्र चाकासारखा गोल - वाटोळा आकार असलेला मासा गडगडत गेला. मोठी गंमत वाटली. त्यावेळी त्या पाठोपाठ एक उडत्या माशांचा थवा पाण्यापासून चांगला फूटभर उंचीवरून झेपावत जाताना दिसला , त्या पाठोपाठ त्या माशांचा शत्रू डॉलफिन मासाही होताच. उडते मासे म्हणजे या डॉलफिनचे अन्न.

एक अज्ञात वळण घेऊन आमचे जहाज एका भूशिराजवळ येताच वातावरणात खूपच निराळा बदल घडून आला. हवा अतिशय थंड झाली. वारेही बऱ्याच जोराने वाहू लागले. इतर खलाशांमध्ये एकदम खळबळ माजली. आपापसात त्या भूशिराजवळ होणारी प्रलयंकारी वादळे, त्यातून निर्माण होणारे भोवरे यांच्या चर्चा सुरू झाल्या.

आमचे दैवं बलवत्तर होते. अगदी सुखरूपपणे आम्ही तेथून पुढे निसटलो.

दोन - तीन आठवड्यातच आमचा प्रवास उष्ण कटिबंधातून मोठ्या मजेने सुरू झाला. कधी कधी जोरदार वाऱ्यानं शिडं अगदी तट्ट फुगून आमचं जहाज शर्यतीतल्या अश्वाप्रमाणे वेगाने पाण्याच्या पृष्ठभागावरून दौडत चाललं होत. एकंदरीत प्रवास मोठा सुखात चालला होता.

इतके दिवस ज्या दिवसाची आम्ही वाट पाहात होतो, तो दिवस उजाडला. आमच्या 'गरुड' ने प्रवाळी बेटांत प्रवेश केला. तो दिवस, तो आनंद मी कधीच विसरू शकणार नाही. स्वच्छ पांढरे चकाकत्या वाळूचे किनारे, खुशीने माना डोलावत असणारे माड आणि सर्वात मोहक- सर्व बेटाचा सौम्य नितळ हिरवेपणा मन मोहून टाकीत होता. आम्ही तिघेही खुळावल्यागत त्या दृश्याकडे पाहात राहिलो होतो आणि न कळत त्या बेटावर राहण्याची मनात इच्छा उत्पन्न होत होती. कदाचित दैवाच्या मनातही तेच असावे.

दिवस मावळला रात्र सुरू झाली आणि निसर्गाने आपले रौद्रेभिषण रूप दाखवायला सुरवात केली. अकस्मात भीषण वादळाला प्रारंभ झाला. पहिल्या सपाट्यातच दोन .डोलकाठ्यांचे तुकडे उडाले. फक्त एक डोलकाठी आणि त्या काठीवरचे शीड असे शाबूत राहिले. अर्थात् तेवढी डोलकाठी पुरेशी होती. सोसाट्याच्या तुफानात शीड उभारणं हेही योग्य ठरलं नसतंच. हे असलं भीषण वादळ तब्बल पांच दिवस थैमान घालत होतं. जहाजावरचं बहुतेक सामान सागरानं गिळंकृत केलं होतं आणि जे बचावलं होतं ते मोडून निकामी झालं होतं. ऐनवेळी जीव वाचवण्याची एक होडी मात्र शाबूत होती. सुकाणूवाल्यांला तिथंच एका खांबाला बांधून ठेवलं होतं. तसं केलं नसतं, तर तोही केव्हाच समुद्रतळाशी गडप झाला असता मी आणि माझ्या मित्रांनी जीवाची आशाच सोडून दिली होती. वाऱ्याच्या झंझावण्यामुळे जहाज कुठं भरकटत होतं हे कपितानालाही समजेनासं झालं होतं. सागराच्या .त्या भागात प्रवाळाचे खडक चोहोकडे विखूरलेले होते. त्यापैकी एखाद्या खडकावर केव्हा जहाज आदळेल आणि त्याचा केव्हा चक्काचूर उडेल हे सांगता येत नव्हतं. अखेरीस सहाव्या किंवा सातव्या दिवशी आमच्या नजरेस जमीन पडली. सभोवताली प्रवाळ खडकांनी वेढलेले ते एक बेट होते. महाकाय लाटा रागारागाने खडकावर धडका देत होत्या. फेसांची पांढरी फुलं सडा शिंपल्यासारखी उधळली जात होती. खडकांच्या पलिकडले पाणी मात्र अगदी शांत होते. त्या पाण्यात शिरायला फक्त एकच मार्ग नजरेस येत होता. कपितानाने निर्णय घेतला आणि आमचे जहाज त्याच मार्गाच्या रोखाने निघाले. पण दैव अजून आमची पाठ सोडायला तयार नव्हतं. एक प्रचंड लाट जहाजाच्या पाठीवर आदळली आणि आमच्या सुकाणूनं राम म्हटले. वारा हेच आमचं सुकाणू उरलं.

सगळ्यांचे चेहरे कमालीचे उतरले होते. सगळ्याच आशा संपुष्टात आल्या होत्या. कपितानाने ती होडी पाण्यात लोटायचा हुकूम दिला. तासाभरात आपण

त्या खडकांवर पोहचू अशी त्याला आशा वाटत होती.

खलाशांच्या कामात कोणालाच उत्साह नव्हता. असल्या तुफानात त्या होडीचा काय निभाव लागणार हे जो तो जाणून होता.

"चला रे - बारीकराव - चला - घाई करा" मी आणि जगूजी वेड्यासारखे डेकवर उभे होतो. त्यावेळी पिराजी म्हणाला - "चला घाई करा - निदान आपण तिघं तरी एकत्र राहू - त्या एवढ्याश्या होडीत किती लोक मावणार आहेत? सगळंच धोकादायक आहे. वजनाच्या भारानं ती उलटली नाही म्हणजे मिळवली. ते काही असो मी या भक्कम वल्ह्याचा आधार घ्यायचं पक्कं केलंय. पहा - या दुर्बिणीतून पाहा - आपलं गलबत त्या खडकावर जाऊन आदळल्याशिवाय राहणार नाही. त्या शांत जागेतच शिरते तर लाट त्या खडकावरून पुढे घुसेपर्यंत आपण या वल्ह्याला घट्ट चिकटून राहायचं. मला खात्री आहे आपण तो किनारा सुरक्षितपणे गाठू शकू; चला! तुम्ही माझी सोबत सोडू नका मात्र.

त्याच्या त्या बोलण्याने माझ्या आणि जगूजीच्या मनांत बराच धीर उत्पन्न झाला होता. मुळात त्याच्यावर आमचा गाढा विश्वास होताच, परंतु एक जाणवलं त्याच्या त्या बोलण्यात फारसा आत्मविश्वास दिसत नव्हता. आसूडाच्या फटकाऱ्यासारखा कडाड् - कड् फुटणाऱ्या भीषण लाटा, संतापानं उसळणाऱ्या लाटा पाहतानाच जाणवत होतं की मृत्यूचे पाश आता आपल्यापासून फारसे दूर नाहीत. मला माझे आई - बाबा आठवू लागले होते आणि अचानक आईनं दिलेला कानमंत्र आठवला - परमेश्वरावर भार टाकायचा, तो आपलं नक्कीच रक्षण करेल! आपोआपच माझ्या मनात धीर उत्पन्न झाला.

जहाज खडकाच्या जवळ येऊन ठेपलं. कपितान खलाशांना आवश्यक त्या सूचना देतच होते. त्यांनी होडी तयार ठेवली होती. पाठीमागे लाटा उसळतच होत्या अन् अकस्मात एक प्रचंड लाट विजेसारखा कडकडाट करीत जहाजाच्या दिशेने येऊ लागली. आम्ही तिघेही ते वल्हं धरण्यासाठी धावलो. तिथे जाऊन पोहोचतो न पोहचतो, तोच ती लाट आमच्या जहाजावर आदळली. त्या रेट्याने आमचं गलबत खडकावर आदळलं आणि त्याच्या पुढच्या भागाचे तुकडे होऊन तो पाण्यात कोसळला. ते अभागी खलाशीही पाण्यात गडप झाले. आमचं वल्हं त्या तुटक्या भागात अडकून बसलं. ते मोकळं करणं आवश्यक होतं. जगूजीनं कुऱ्हाड घेतली आणि ते सोडवण्यसाठी धडपडू लागला. वारा आणि लाटा यामुळे गलबत सारखं हिंदकळत होतं. घाव नेमका न बसता, दोरीच्या ऐवजी चुकून

त्या वल्ह्यावरच बसला आणि कुऱ्हाड तेथेच रुतून बसली. क्षणभर काहीच सुचलं नाही. पण इतक्यात मागून अजून एक वल्हं आपोआपच मोकळं झालं. पाण्यात पडून ते इकडे तिकडे वाहात जाण्याच्या अगोदरच, क्षणार्धात आम्ही ते पकडलं. पण त्या नादात आम्ही दुसऱ्याच संकटात सापडलो. त्याखाली उसळणाऱ्या भोवऱ्यात सापडून गटंगळ्या खाऊ लागलो. लाटांच्या उसळंत्या थैमानात आमचं गलबत गरगरू लागलं होतं. सारे खलाशी पाण्यात फेकले गेले होते. बिचारे त्या संकटापासून वाचण्यासाठी जिवापाड धडपडत होते. या गडबडीनंतरच मला फारसं काहीच आठवत नाहीय. माझे डोळे आपोआप मिटले जात होते. पण त्यावेळी नेमकं काय झालं होतं ते मला नंतर कळले होते.

जेव्हा मला जाग आली त्यावेळी मी त्या बेटावर होतो. बिछान्यासारखा मऊ गवतावर पडलो होतो. पिराजी आणि जगूजी मला भानावर आणण्याचा प्रयत्न करीत होते. पिराजी वारंवार माझ्या तोंडावर, डोळ्यावर गार पाणी शिंपडीत होता. माझ्या कपाळावर भली मोठी खोक पडलेली होती आणि त्यातून रक्तस्राव होत होता. जगूजीने कसल्यातरी चिंधीने ती जखम दाबून धरलेली होती.

मी हळूहळू डोळे उघडले. पिराजीच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. हळूवार शब्दात त्याने विचारले, "आता बरे वाटतेय नां?"

क्षणभर मला काहीच कळले नाही. वाटले आपण जहाजावरच आहोत आणि आपल्याला उठायला उशीर झालाय! कपितान चिडलेयत आणि आता ते पुन्हा डोलकाठीवर चढून बसण्याची शिक्षा फर्मावणार! या विचारासरशी मी दचकलो. ताड्कन उठून बसण्याच्या नादात असतानाच पिराजीने मला दाबून धरले आणि तसेच पडून राहावयास सांगितले. मग मात्र मला भान आले. जहाज तर बुडाले होते! म्हणजे आपण त्या संकटातून बचावलो आहोत!

किंचित् थकवा वाटत होता. वाऱ्याची एक थंडगार झुळूक अंगावर शिरशिरी उमटवून गेली. त्या झुळूकेबरोबर कसला तरी एक मंद सुगंध दरवळत आला होता. क्षणभर घर - आई - बाग - आठवले; पण ते क्षणभरच. किनाऱ्यावर फुटणाऱ्या लाटांनी जाणीव करून दिली की आपण आता घरी नसून एका बेटावर पडलो आहोत. वादळी वारे, लाटा, फुटलेले गलबत - जगण्याची धडपड...सगळे चित्र अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले. हळूहळू मी माझे डोळे उघडले. जगूजी माझ्या तोंडाकडे अस्वस्थ, भयभीत, साशंक अशा नजरेने टक लावून पाहात होता.

"बारक्या...बरं वाटतंय ना आता?" त्याच्या स्वरात कमालीची काळजी

आणि प्रेम भरलेले होते.

मी हसलो. वर पाहिले. "म्हणजे? मला काय झालंय? झोपच लागली होती ना? मी मस्त आहे–"

"म्हंजे बेशुद्ध पडण्याचे ढोंगच की काय?– टरकवलेस आम्हाला–" डोळ्यातली अश्रू लपवीत पिराजीने हसत विचारले. कदाचित् त्यांना वाटले असावे की, आता मी मरणारच!

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 2660 दिनांक 9/9/10/93
क्र. .........
विषय बा.वा.

# तीन

हाताचे कोपर टेकवत मी जरासा उठून बसलो. कपाळावरून हात फिरवला. अद्याप रक्त वाहायचे थांबले नव्हतेच.

परत मला अलगदपणे खाली निजवत जगूजी म्हणाला," अं हं! इतक्यात नको ऊठूस! तुझी जखम खरंच फार खोल आणि मोठी आहे. थकवा जाणवत असणारच. थोडंसं अजून पाणी घे, बरं वाटेल. जवळच एक झरा आहे; कसं गार आणि मधूर पाणी आहे बघ. इतक्यात बडबड करू नकोस." क्षणभर तो थांबला; पुढे म्हणाला, "नंतर सगळं तुला कळेलच आता मात्र फक्त विश्रांती घ्यायचीस. समजलं ? "

"जगू, अरे थोडं तरी त्याला बोलू दे." पिराजीच्या मनात असलेली भीती आता दूर झाली होती. मला वाहणाऱ्या वाऱ्याचा त्रास होऊ नये म्हणून तो मोडक्या फांद्या आणून त्यांचा आडोसा करण्याच्या खटपटीत होता. खरे तर माझ्या डाव्या अंगाला असलेल्या खडकापुढे वाऱ्याचा त्रास असा मुळीच होत नव्हता. फांदी जमीनीत रोवता रोवता तो म्हणाला, " बोलणं म्हणजे जिवंतपणाचं लक्षण.

तासभर लाकडाचा ओंडका होऊन पडला होता; पण आता चागला भानावर आलाय ना? मग बोलू दे त्याला. त्याची बडबड ऐकली की मलाही बरं वाटतं.". माझ्याकडे वळत तो म्हणाला, "बाकी तुझ्यासारखा प्राणी पूर्वी कधी मला नव्हता दिसला बरं का बारीकराव! तुझे नेहमीच काही ना काही पराक्रम सुरू असतात. महाशय, तुम्ही तर माझे सगळे दातच निकामी करून टाकले होते. काय गुदमरून टाकला होतास, बापरे! आणि आता हे वर मेल्याचं ढोंग! धन्य आहेस बाबा तू!"

पिराजीची बडबड अखंड चालू होती. मी पूणपणे भानावर आलो होतो. माझा मेंदू आता पूर्ववत् विचार करू शकत होता. आपल्या हातून काही तरी भयंकर घडलं असावं, असं माझं मलाच वाटू लागलं होतं!

"म्हणजे? मी असं काय केलं रे?"

"तुला अगदीच आठवत नाही, की हे सुद्धा ढोंगच?"

"तुझी शपथ! मला नाही काहीच आठवत. पाण्यात पडेपर्यंतचं आठवतंय पुढचं नाही."

"पिराजी आता जरा गप्प रहा पाहू, तो आजारी आहे. उगाच त्याला त्रास नको देऊस. राघोजी, मी सांगतो काय झालं ते. आपलं गलबत खडकावर आपटल्यावर आपण तिघांनीही पाण्यात उड्या घेतल्या. बरोबर? हं, उडी मारण्याच्या नादात किंवा घाईत म्हणा, तुझं डोकं वल्ह्यावर जोरानं आपटलं. अन् खोक पडली. आपण काय करतोय, हे तुझं तुलाच कळत नव्हतं, तू या पिराजीच्या गळ्याला गच्च मिठी मारलीस; अन् तुझ्या हातातली ही दुर्बिण अशी घट्ट पकडली होतीस काय सांगू, ती पिराजीच्या तोंडातच खुपसली गेली न् काय."

"काय सांगतोस - अरे गाढवा तोंडात गेली नाही - नरड्यात कोंबली म्हण - ही...ही बघ खूण - त्या दुर्बिणीच्या रुतलेल्या धारदार काठांची - अजून नरड्यात ठणका मारतोय."

"बरं, बरं...ठणकत असेलही म्हणा." जगूजी पुढे सांगू लागला – तू त्याला मिठी मारलीस आणि मलाही बुडवणार असं वाटलं. पण त्यानं वल्हं चांगलं घट्ट पकडलंयसं पाहून मी तुम्हा दोघांना जोरानं किनाऱ्याकडे ढकलीत राहिलो. देवाची कृपा, खडकाच्या आतलं पाणी शांत होतं. आपण सगळेच सुखरूप आहोत.

"पण..कपितान.. खलाशी..."

जगूजीने निराशेने मान हलविली.

"म्हणजे ?...ते...ते सगळे बुडाले ?"

"नाही, अगदी तसंच असं नाही...पण फारशी आशाही नाही...ते जिवंत असतील म्हणून..."

"अरेरे!...बिचारे..." मला खरोखरीच मनापासून वाईट वाटत होते. ती सगळीच माणसे चांगली होती.

"पण खरं सांगू का? जसाजसा त्यांचा अधिकाधिक विचार करतोय ना तशी तशी मला जास्तच आशा वाटू लागली आहे." जराशा उत्साहाच्या शब्दांत जगूजी बोलत होता. बारीकराव मी खूप प्रवास केलाय जुन्या म्हाताऱ्या खलाशांचे, तांडेलांचे अनुभवही खूप ऐकलेयत. त्या लोकांनी असली हजारो बेटे पाहिलीय, म्हणजे आज ना उद्या असल्याच एखाद्या बेटाला ते सुखरूप लागतीलही...तशी दाट शक्यता आहे."

"मलाही तसंच वाटतं...जगूजी...अरेच्या, पण ह्या बारीकरावांच्या सेवेत होतो...त्यावेळी तू त्या खडकावरच उभा होतास ना?... मग आपल्या जहाजाचं काय झालं ?"

"त्याचे फुटून तुकडे झाले की नाही हे नाही मला नक्की सांगता यायचं. पण ते सुमद्रतळाशी गेलं. हे मात्र खरं. मी मघाशीच सांगितलं ना? तशी त्याची नाळ त्या टोकाला लागली. पण दुसऱ्याच लाटेने ते एकदम वर उचललं अन् भलत्याच दिशेने सुसाट निघालं. होडीतल्या लोकांनी गाठण्यासाठी खूप धडपड केली, पण ते जवळ जाण्यापूर्वीच त्यात झपाट्यानं पाणी भरलं अन् ते बघताबघता बुडालं. जहाजाची अशी शोकात्म अवस्था झाल्यावर त्या लोकांनी किनारा गाठण्याची धडपड सुरू केली."

तो थांबला, सगळेच सुन्न होऊन गेले होते. सर्वजण ह्या अशा अचानक उद्भवलेल्या संकटाचा आणि परिस्थितीचा गंभीरपणाने विचार करीत असावेत. जगूजीच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही एका अज्ञात अशा बेटावर होतो, हे जरी खरं असलं तरी, त्या बेटाविषयी अद्याप आम्हाला काहीच अशी माहिती झालेली नव्हती. ह्या बेटावर वस्ती कोणाची असेल? रानटी, नरमांस भक्षकांची तर नसेल? असली तर?... ते आपल्याला जिवंत खातील?... आणि जर कसली कोणाची वस्ती नसलीच तरीही पंचाइतच होती. खायचं काय? उपासमारीनं मरणार की काय? जर गलबतं फुटलं नसतं आणि खडकातच अडकून पडलं असतं तर!

निदान खाण्यापिण्याचा तरी प्रश्न मिटला असता. काही हत्यारं मिळवून मोडकी - तोडकी का होईना पण एखादी झोपडी नक्कीच उभारली असती. पण... ! दुर्दैव ना आमचं ! आता कसलीच आशा नाही. मरणाची वाट बघायची ! बहुधा शेवटचं वाक्य न कळत माझ्या तोंडून मोठ्यानं बाहेर पडलं असावं.

जगूजी म्हणाला, "खरं तेच बोललास ! मरणाची वाट बघायची ? वेडायस ! अरे वाचलो म्हण आपण." त्याच्या चेहऱ्यावर अपूर्व उत्साह प्रकाशत होत होता. तो हसला; म्हणाला, "विचारांना अस भरकटू देऊ नकोस. हिंमत हारायची नसते ! जग खूप चांगलं आणि खूप सुंदरही आहे !"

"बरोबर बोललास ! झालं ते अति सुंदर झालं बघ ! अगदी उत्कृष्ठच. अरे आपण तीन तगडे तरुण नि हे अख्खं बेट आपल्या एकट्याच्या मालकीचे !" पिराजी म्हणाला. "अरे आपण सम्राट आहोत ह्या बेटाचे ! काय सजलास." क्षणभरानं जगूजी म्हणाला, तशी आपली परिस्थिती काहीशी बिकट आहे, त्यात शंका नाहीच. जर ह्या बेटावर कुठल्याही मनुष्य प्राण्याची वस्ती नसली तर काही अंशी आपल्याला पशूंसारखंच राहावं लागेल. आपल्याजवळ म्हणण्याजोगी अशी कोणतीच हत्यारं नाहीयत. साधा चाकू देखील नाही."

"आहे, आहे ! सुदैवानं - " पिराजी आपल्या तुमानीच्या खिशात चाचपडू लागला. त्यातून एक एकपाती चाकू काढला. परंतु त्याचं पातंही मोडकंच होतं.

"चालेल. काहीच नसण्यापेक्षा हेही बरंच आहे. चला आता काहीतरी उद्योगाला लागायलाच हवं. नुसता विचार आणि बडबड करून कसं भागेल ? बारीकराव तुम्हाला आता कसं वाटतंय ? चालता येईलना ना ? की घेऊ पाठुंगळी ?" जगूजी म्हणाला अन् हंसला.

"अगोदर आपण आपल्या संपत्तीची मोजदाद करूया अन् मग त्या टेकडीकडे कूच करूया. आपल्या मालकीचं हे बेट आहे तरी कसलं ? हे तरी पाहायलाच हवं. नाही का ? कसंही असलं तरी आता ते आपलं घर आहे."

आम्ही सगळे उठलो एक छानसा खडक बघून बैठक मारली आणि मधोमध तिघांनी आपापल्या वस्तू टाकायला सुरुवात केली.

सर्वांनी आपले खिसे, चोर खिसे रिकामे केले. एकंदरीत मिळालेल्या वस्तू अशा होत्या - एक लहान एकपाती चाकू, पातं अर्ध मोडलेलं नि गंजकं, अन् शिवाय त्याला दोन तीन खिंडीही पडलेल्या ! ते पाहून पिराजी म्हणाला, "हे छान आहे. चाकू आणि करवत दोन्ही एकत्रच." सगळे हसले, तरी त्याचं

म्हणणं पटलेही. नंतर तीन शीशाच्या कांड्या. लेखणीसारखा कागदावर व कापडावर उपयोग करता येणार. शिवायं त्याची एक डबी नंतर मिळाली नऊ - दहा फूटी चामड्याची चिवट - टणक वादी. मग एक शिडं शिवण्याची सुई दुर्बीण. ही दुर्बीण जहाज बुडालं तेव्हा माझ्याच हातात होती. पण तिचा काय उपयोग होईल, हे आताच सांगता येत नव्हतं. तिच्या लहान बाजूकडील काच फुटून चक्काचूर झालेली होती. तरीही ती आमच्याजवळ असल्याचा आनंद होताच आणि सगळ्यात शेवटची वस्तू म्हणजे जगूजीच्या बोटातली पितळेची अंगठी. जगूजी ती अंगठी का घालीत होता, ते कधीच कुणाला समजलं नव्हतं. पिराजी म्हणायचा, ती त्याला कोणी तरी मंत्रून दिलेली होती. त्यामुळे भूत वगैरे त्याच्या आसपासही फिरकू शकत नव्हतं. पण जगूजीनं त्या गोष्टीला कधीच दुजोरा दिलेला नव्हता. या वस्तूंशिवाय गुल पेटवणं अन् आमच्या अंगावरचे कपडे.

प्रत्येकाची तुमान मात्र भक्कम अशा जाड कापडाची. तागाच्याच कापडाची होती आणि पायात खलाशी लोक वापरतात तसे कातडी जोडे, पायामोजे. जगूजीच्या अंगात जाडसर कापडाचा लाल रंगाचा कुडता होता. त्यावर निळं जाकीट. त्याला पाच-सहा खिसे होते आणि खलाशी लोक गळ्यात बांधतात तसला रुमाल रुमाल होता. पिराजीच्या अंगात साधारणतः तसल्याच कापडाचा, पण पट्टे पट्टे असलेला कुडता होता. डोक्यावर गवती टोपी होती. त्याच्याही जवळ जाडे मोजे होते. रुमालावर मात्र निळे - पांढरे ठिपके होते. मोजे लोकरी होते. म्हणजे एकंदर आम्हा तिघांचे सगळे कपडे सारखेच होते. एका बाबतीत मात्र आम्ही फार सुदैवी ठरलो होतो. समजा आमच्यावर ही जी आपत्ती आलेली होती - आमचं जे गलबत फुटलेलं होतं, ते दिवसा न फुटता रात्रीच्या वेळी फुटलं असतं तर? आमची काय भीषण अवस्था झाली असती? असा विचार मनात आला की - खात्री पटायची की, एक दैवाची आमच्यावर कृपा होती अन् आमच्याजवळ जे काही होतं तेच फार होतं.

"अरे पण.. एक राहिलंच की, आपलं ते वल्हं? - ते कुठं आपण गणतीत घेतलंय?" जगूजी म्हणाला,

पिराजीनं क्षणभर माझ्याकडे पाहिलं. "त्याला घेऊन काय करायचंय? तसली शेकडो वल्ही करता येतील इतकं लाकूड ह्या बेटावर आहे."

"होय" जगूजी म्हणाला. "होय." तू म्हणतोयस ते खरं आहे. पण...त्या वल्ह्याच्या टोकाला बसवलेलं जे कडं आहे...ते ह्या जंगलातल्या कुठल्याच झाडाला

नाहीय. त्याचा उपयोग आपण करू शकू.''

''अगदी बरोबर.'' मी म्हणालो, ''चला लगेचच आणून टाकू ते.'' आम्ही तिघेही उठलो. झटक्यानं किनाऱ्याकडे निघालो.

माझी दृष्टी साहजिकच आजूबाजूच्या वृक्ष, वेली, झुडूपे यावर जात होती. नारळाची झाडे खूपच होती. लहान - मोठी, नारळ आलेली, न आलेली. दूरवर चमचमत्या वाळूचा पट्टा पसरलेला होता. त्या पलिकडे अजस्र असा प्रवाळ खडक - किल्ल्याच्या तट - बुरुजांप्रमाणे उभे होते. आकाशाला भिडणाऱ्या हिरव्या निळ्या लाटा तेथल्या तेथेच थोपवून धरत होते आणि अधूनमधून समुद्रावर तरंगणारे समुद्रपक्षी दिसत होते. आपोआप या सगळ्या सुंदर दृश्याचा परिणाम आमच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबीत होत होता. आम्ही जसजसे समुद्राच्या जवळ जाऊ लागलो होतो, तसतसा समुद्रावरून येणारा गार वारा आणि त्या वाऱ्यासंगे येणारे पाण्याचे तुषार आमचा सगळा शीण घालवीत होते.

''ये हे हुर्रे!'' अशी पिराजीने आरोळी ठोकली. मी आणि जगूजीने चमकूनच त्याच्याकडे पाहिले. तो समुद्रातून कसली तरी अवजड वस्तू आपली सारी शक्ती पणाला लावून किनाऱ्याकडे ओढून आणण्याच्या खटपटीत होता.

''हा म्हणजे अगदी विचित्रच आहे. त्याने माझे मनगट पकडले आणि म्हणाला, ''चल, काय उद्योग चाललाय ते पाहू या.''

''हे पहा - हे पहा दोस्त! हुर्रे हुर्रे... अगदी आपली मालमत्ता... लाल निशाण.''

पिराजी नेहमीच असलं काही तरी चमत्कारिक बोलत असायचा. मालमत्ता एकवेळ आपण समजू शकू. पण हे लाल निशाण? काही अर्थ आहे का या शब्दाला?

त्याच्याजवळ पोहोचलो. तर हा बहादूर त्या वल्ह्यात रुतून बसलेली कुऱ्हाड काढण्याच्या खटपटीत गुंतलेला. पिराजीनं आपली सगळी ताकद पणाला लावली होती. पण कुऱ्हाड मात्र काही केल्या निघत नव्हती.

''शाब्बास पिराजी हे काम मात्र तू एकदम झकास केलंस!'' जगूजी आनंदानं म्हणाला आणि तो पिराजीच्या मदतीला गेला. एक दोनदा प्रयत्न केल्यावर सटकन ती कुऱ्हाड त्या चिवट मजबूत लाकडातून बाहेर आली. ''शंभर चाकूंपेक्षा ही अधिक उपयोगी आणि महत्त्वाची वस्तू आहे. अन् धारही चांगलीच तेज आहे. पातही मजबूत आहे. सुदैवानं हाती लागली म्हणायची.''

"तर काय! दांडाही चांगला मजबूत आहे. पिराजी म्हणाला. "माझ्या हाताचे तुकडे पडायची वेळ आली होती. बाबांनो वल्ह्याच्या एका बाजूला एक बऱ्यापैकी पत्राही होता. तोही उपयोगाचा होता. आम्ही ते वल्हे उचलून घेतले. सवडीने बाजूचे लाकूड जाळून तो पत्रा मोकळा करता येणार होता.

"मित्रांनो, आता आपण आपल्या गलबताला जिथं जलसमाधी मिळाली, तिथं जाऊ." जगूजी म्हणाला. "अजून काही किनाऱ्याला लागलं आहे की काय, याचा शोध घेऊ! तशी शक्यता कमीच आहे म्हणा, पण एक संधी घेऊन बघू. तोपर्यंत भूकही लागेल. दिवस मावळायला आलाय."

आम्ही तिघंही त्या खडकाकडे निघालो. पायाखालची चकचकीत वाळू गुदगुल्या करीत होती. जोडच्यातूनही ते जाणवत होते. एकदम पिराजीच्या मनात शंका आली आपण खायचं काय? आजूबाजूला असलेल्या झाडांवरच्या फळांशिवाय अजून काहीच नव्हतं. परंतु जी फळं होती, ती मात्र भरपूर होती.

"जगूजी, ही फळं विषारी असली तर काय करायचं?"

"तसली भीती बाळगू नका." जगूजी आत्मविश्वासानं म्हणाला. "असल्या जातीची काही झाडं माझ्या माहितीतली आहेत. आपल्याकडेही कधी कधी ती आढळतात. मघाशी ती पाखरही हीच फळं खात होती की! पक्ष्यांना जे चालतं ते आपल्याला का नाही चालणार? एकीकडे हात करीत म्हणाला, "ते बघ, कोवळे- भरलेले दोन्ही प्रकारचे नारळ आहेत बघ."

"अरे खरंच की!" पिराजी ओरडला. रस्त्यानं चालताना कधीही तो आजूबाजूला बघायचा नाही सरळ नाकासमोर चालत राहणार. पण त्याच्या अंगी विलक्षण. चपळाई होती. ते नारळ दाखवताच माकडाप्रमाणे उड्या मारीत तो त्या झाडावर चढलाही पटापटा चार-सहा नारळ तोडून खाली टाकले. वाळू असल्यामुळे फुटले नाहीत.

"हे इतक्यात खायचे नाहीत. असेच राहू देत. अगोदर आपण आपलं काम संपवून येऊ" जगूजी म्हणाला.

"जशी आपली आज्ञा कपितानसाहेब." पिराजी म्हणाला.

"तहान लागलीय. एखादा जवळपास झरा असला तर बरं होईल! पण तशी काही चिन्ह नाही दिसत. अन् काय रे जगूजी, तुला प्रत्येकच गोष्ट अशी काय रे ठाऊक असते? आतापयंत कितीतरी झाडांची नावं सांगितलीस तू, अन् तरीही म्हणतोयस की आपण कधी असल्या बेटाला पाय नव्हता लावला."

जगूजी हसला. म्हणाला "मला प्रत्येक गोष्टीची माहिती आहे हे तुला कुणी सांगितलं? मी फक्त जुन्या लोकांनी सांगितलेल्या कथा ऐकतो अन् त्यांनी लिहून ठेवलेल्या आठवणी सवड मिळेल तेव्हा वाचीत बसतो, बस!"

"म्हणजे तुझं ज्ञान फक्त ऐकीवच की! हत्तेरे की!"

"बरोबर आहे तुझं. पण काही काही बहाद्दर असेही असतात की, त्यांना नारळ हे नारळीच्या झाडाला लागतात. हेही ठाऊक नसतं."

"काय की बुवा. पण मला ते ठाऊक आहे." सगळेच हसलो.

"ऐकलेल्या आणि वाचलेल्या ज्ञानाला कमी लेखू नकोस. समज आपल्याला एक घर अथवा जहाज बांधायचं आहे. त्याची माहिती ऐकून अथवा वाचून मिळविली तर त्याचा तुला उपयोग होईल की नाही?"

"बरं बाबा! तू शहाणा. झालं?" पिराजी म्हणाला. जगूजीनं त्याच्या पाठीवर थाप मारली. "तुला तहान लागलीय असं तू म्हणाला होतास नां? त्या झाडावर चढ एक हिरवा कोवळा नारळ आण खाली काढून."

पिराजी चकित होऊन त्याच्याकडे पाहातच राहिला. पण मग लगेच पळत सुटला. एक नारळ घेऊन आला.

"आता असं कर तुझ्या चाकूनं त्याला एक भोक पाड नि लाव तोंडाला." जगूजी म्हणाला.

पिराजीनं अगदी त्याप्रमाणे केलं. त्याची ती घाई बघून आम्ही दोघेही हसत सुटलो. घुट-घाट-घुट करीत तो ते नारळातलं पाणी जराही न विसावता पीतच राहिला. अर्धा अधिक नारळ एका दमातच रिकामा केल्यावर श्वास घेण्यासाठी म्हणून थांबला, "अगदी अमृताची चव आहे रे याला! वा! जगूजी तुला मानला आपण. तुझ्याइतका भलेपणा असलेला माणूस आलम दुनियेत सापडणार नाही! याची नुसती चव तरी पाहा." त्याने तो नारळ माझ्या तोंडाला लावला. अतिशय गार नि मधूर पाणी होतं. मग ते शहाळं जगूजीच्या हातात दिलं. त्यानेही एक-दोन घोट घेतले. मग म्हणाला आता सांग माझं ऐकीव ज्ञान खरं आहे की खोटं?"

पण पिराजीने त्याच्याकडे लक्षच दिले नाही. म्हणाला, "आता मध्ये खोबरं आहे."

"पण त्यानं तहानेपेक्षा भूकच जास्त भागते."

"कमाल आहे! अन्न आणि पाणी एकदमच" पिराजी उद्गारला. "आंघोळीला

समुद्र, तहान-भुकेला नारळ, काम - शून्य! खर्च - शून्य! आता आपण कायमचेच इथं राहणार!" आणि तो किनाऱ्याकडे धावत सुटला.

आमचं जहाज फुटलं होतं त्या ठिकाणी आम्ही सगळीजण येऊन पोहोचलो. सर्वांच्या नजरा 'काहीतरी' शोधीत होत्या, पण केवळ कपितानाच्या जोड्यांखेरीज उपयुक्त असं काहीच नजरेस येत नव्हतं. जगूजीनं हे जोडे उचलले. खूपच मोठे होत होते त्याला. तरी त्याने तसेच ते आपल्या पायात चढवले. दोन-चार पावले चालूनही पाहिले. त्याचा चेहरा वेडा-वाकडा झाला, कारण ते कमालीचे अवजड होते. जणू काही लोखंडाचेच बनविलेले असावेत. त्याने ते पायातून काढले. दोन्ही नाड्या एकमेकांना बांधल्या अन् ते चक्क गळ्यात अडकविले!

काहीशा निराश अवस्थेतच आम्ही 'आमच्या' खडकाकडे परतलो. सूर्य मावळला होता. अंधाराची सुरूवात होत होती. आजूबाजूचे जे काही अजून निरीक्षण करायचे राहिले होते ते उद्यावर सोपवून दुसऱ्या उद्योगाला लागलो. रात्रीच्या निवाऱ्याची काही तरी व्यवस्था बघणं आवश्यक होतं. आजूबाजूच्या झाडांच्या त्यातल्यात्यात मोठ्या-रुंद पानांच्या फांद्या तोडून आणल्या. मधोमध झोपण्यापुरता चौकोन मोकळा सोडून त्या फांद्यांची चोहोबाजूंनी एक भिंत उभारली. इथली हवा तशी शांत व प्रसन्न होती. त्यामुळे उघड्यावर झोपणे सहज शक्य होते. फक्त प्रश्न एकच होता. समजा रात्री एकाएकी पावसास प्रारंभ झाला तर? किंवा पहाटे पहाटे दंव पडू लागले तर? जगूजी स्वस्थ बसणारा नव्हता. त्याने लगेचच कामास सुरुवात केली. थोड्या वेळातच त्या चार भिंतीवर एक छप्परही चढवले. आता मात्र खरोखरीच भूक लागली होती. जमिनीवर गवत-पाने पसरून मस्तपैकी बिछायत तयार केली, पण पुढे वेगळाच प्रश्न उभा राहिला.

"विस्तव कसा पेटवायचा?" - पिराजीने प्रश्न केला.

"किनाऱ्यावर गोरगोट्या भरपूर आहेत. पण त्या कशावर घासणार? पोलादाशिवाय सगळं अवघड आहे पण ते काही असलं तरी आपण प्रयत्न करू -" आणि उठून तडक किनाऱ्याकडे निघून गेला. हव्या तशा दोन चार गारगोटीवर गुल ठेवला अन् तो पेटवण्यासाठी धडपडू लागला. खूप प्रयत्न केल्यावर फक्त एक बारीक ठिणगी पडली. पण तेवढ्यात तो गुल काही पेट घेईना. कदाचित पाण्यात भिजल्यानंही असेल. मग एक गारगोटी अन् ती लोखंडी कडी यांचा प्रयोग करून पाहिला. पण गुल काही पेटला नाही. मग कुऱ्हाडीचा पात्यावर प्रयोग केला. पण ऊहूं! जगूजीची ही धडपड पिराजी पाहात होता. सारखे येणारे

अपयश बघून त्यालाही वाईट वाटत होते. तुमानीच्या दोन्ही खिशात दोन्ही हात खुपसून तो स्व:ताशीच कसलातरी विचार करीत होता.

"आता काय करायचं?" जणू स्वत:शीच तो बडबडला. "कच्चं अन्न खायची तशी मला थोडी फार सवय आहे. पण अंधारात जेवायचं म्हणजे.. कसंतरीच वाटतं - नाही का? दिवस किती मजेत पार पडला. रात्र मात्र ही अशी... छ्या: !" क्षणभर तो थांबला - अन् एकदम ओरडला... "अरेच्या.. पण आपल्याजवळ दुर्बिणीची ती मोठी काच आहे की... ते आपण कसं विसरलो?"

"हो आहे की... पण बाळा.. आत्ता सूर्य कुठं आहे? - ते तू विसरलास -"

पिराजीचा चेहरा पुन्हा उतरला. तो गप्प झाला. अंधारात कुठंतरी बघत राहिला.

"ट्यॅक्- " जगूजीनं तोंडातून आनंदाने आवाज काढला. धावतच एका झुडपाजवळ गेला. एक जराशी जाडी फांदी तोडून आणली. सगळी पाने काढून टाकली. अन् म्हणाला, "आपल्याजवळ ती चाबकाची वादी आहे ना? आणा बघू ती इकडे. घरी एकदा असला प्रयोग केला होता. इथंही करून बघू. आपले पूर्वजही अशाच पध्दतीनं विस्तव निर्माण करायचे - "मग त्याने एक धनुकली तयार केली आणि एक वाळलेल्या फांदीचा वीतभर तुकडा मोडून त्याला दोन्ही बाजूनं बारीक टोकं केली. त्या तुकड्याभोवती धनुकलीच्या वादीचे तीन चार वेढे दिले. एक टोक, खाली एक ढलपी ठेऊन ते आपल्या छातीवर ठेवलं. आणि मग दुसरं टोक त्या गुळाच्या तुकड्यावर ठेऊन धनुकली जोरानं फिरवायला सुरुवात केली - म्हणजे गिरमिटानं सुतार मंडळी ज्याप्रकारे लाकडाला भोक पाडतात - त्याप्रमाणे. थोड्याच वेळात गुळातून धूर निघू लागला आणि काही क्षणातच गुळानं पेट घेतला. तेवढे पुरेसे होते. काटक्या गवत टाकून मस्तपैकी शेकोटी तयार झाली. त्यातून धुराबरोबर ठिणग्या आणि जाळही वर आभाळात जाऊ लागला. आमचे ते घर त्या प्रकाशाने उजळले. पण मध्येच जगूजीला काय वाटले कुणास ठाऊक. त्याने आमच्या घरावर जे छप्पर केले होते, ते काढून टाकले, म्हणाला - "रात्रीतून एखाद वेळी पेटायचे - भानगड नको!" आम्हालाही ते पटले.

मग त्या उबदार प्रकाशात शहाळ्यांतले पाणी, खोबरे मनसोक्त हादडले. पोट टम्म झाल्यावर आकाशातल्या लुकलुकत्या ताऱ्यांकडे पहात आडवे झालो. बोलता बोलता कधी झोप लागून गेली ते आमचे आम्हालाही कळले नाही.

● ● ●

# चार

मंद मंद वाहणारा वारा, कोवळी सोनेरी किरणे आणि ताजेतवाने होऊन किलबिल करणाऱ्या पक्षांचा कलरव, वाऱ्याच्या झुळकीबरोबर येणारा नुकत्याच उमललेल्या रानफुलांचा गंध...

मला जाग आली, मी डोळे उघडले.

सर्व प्रथम दर्शन झाले ते झावळ्या आडून डोकावणाऱ्या निळ्या आकाशाचे मी चटकन् उठून बसलो. जगूजी आणि पिराजी अजून गाढ झोपेतच होते. माझ्यामुळे त्यांची झोपमोड होऊ नये, म्हणून जराही आवाज न करता बाहेर आलो.

समोरच्या झाडावर सुंदर पिसाऱ्याचा एक पोपट बसला होता आणि तो माझ्याकडे मोठ्या कुतुहलाने पहात होता. मधूनच आपल्या आवाजात शीळ घालीत होता.

जराशाने असाच एक कुठलातरी समुद्रपक्षी चोचीत मासा धरून उडत चालला होता. नेमका तो पिराजीच्या डोक्यावर आला आणि त्याने आपली चोच उघडली, टप्पकन चोचीतला मासा झोपलेल्या पिराजीच्या तोंडावर पडला अन् पिराजी दचकून, ओरडतच उठला.

पण सगळा प्रकार ध्यानात आल्यावर त्याचे त्यालाच हसू आले. एक मोठी जांभई दिली अन् उठून उभा राहिला. समोर पसरलेल्या सागराकडे नजर जाताच, तो चमकला आणि एक मोठी आरोळी ठोकून, भराभरा अंगावरचे कपडे काढून भिरकावले अन् तसाच समुद्राकडे बेभानपणे पळत जाऊन पाण्यात उडी मारली. त्याच्या आरडाओरड्याने जगूजीही जागा झाला. आश्चर्याने सभोवार पहात राहिला. समोर पाण्यात डुंबणाऱ्या पिराजीकडे लक्ष जाताच त्याला हसू आले. मग त्यानेही भराभरा आपल्या अंगावरचे कपडे भिरकावले. काहीसे वाढलेले केस मानेला झटका देऊन मागे केले अन् एखाद्या चपळ, उमद्या चित्त्याप्रमाणे झेपावत सुसाट वेगाने समुद्राकडे पळत सुटला. धाडकन् पाण्यात उडी घेतली, त्यावेळी वाटले पाण्याचा पर्वतच उभा आहे. हे सगळे पाहून माझ्याही अंगात वारे शिरले. मलाही उत्तम पोहता येत होते. मीही एक चांगल्यापैकी पाणबुड्या होतो. पाण्याशी येताच मी मला समुद्राच्या स्वाधीन करून टाकले.

पिराजी कधी खोल पाण्यात जायचा नाही. डुबकी तर कधीच घ्यायचा नाही. मी आणि जगूजी मात्र पोहण्याचा आनंद मनमुराद उपभोगीत होतो. आम्ही बऱ्याच खोल पाण्यात आलो होतो. मधून डुबकी घेऊन अगदी समुद्राच्या तळापर्यंत सफर करून येत होतो. जेव्हा मी अशी डुबकी घेतली, त्यावेळी वाटले होते की समुद्राच्या तळाशी असून असून असणार काय? रेती-शंख-शिंपले-दगड-धोंडे, परंतु जेव्हा मी डुबकी घेतली अन् खाली आलो, त्यावेळी क्षणभर वाटले की, आपण एखाद्या सुंदर अशा बागेत तर आलेलो नाहीत ना? त्या आतल्या तलावात, तळाला विविध प्रवाळांचा सुंदर असा जाडच्या जाड गालीच्या पसरलेला होता. काही कुत्र्याच्या छत्रीसारखे, तर काही कमळासारखे झेलेदार नि खाली उंच देठ असलेले, दुसरे लहान झुडूपासारखे, अनेक फांद्या असलेले, गुलाबी-पांढऱ्या रंगाचे. या प्रवाळामधूनच समुद्रवेलींनी आपले जाळे पसरले होते. त्यांचा तो डौलदार आकार आणि अनंत मनोहर, मोहक आकार, रंग यांची एकच मैफल जमली होती. त्याच्यामधूनच सुळकन इकडून तिकडे रंगीबिरंगी लहान-मोठे मासे धावपळ करीत होते. मी आणि जगूजी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहात राहिलो होतो. पण त्यांनी आमच्या अस्तित्त्वाची जराही दखल घेतली नव्हती. आपल्याच नादात होते ते.

जगूजीनं प्रवाळांच्या देठांचा आधार घेऊन त्या बागेतून रांगायला आरंभ केला. अर्थात त्याचे निरीक्षणही चालूच होते. रांगता रांगता त्यानं दोन तीन

कालवं गोळा केली. मीही मग दोन चार कालवं मिळवली. जगूजीच्या जवळून एक चटेरीपटेरी रंगाचा, बऱ्यापैकी मोठा असलेला मासा जाताना दिसला अन् जगूजीनं त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो कसचा त्याच्या हाती सापडतो! जगूजी माझ्याकडे पाहून हसला, अन् क्षणार्धात बाणासारखा सणसणत वर निघाला. मी पाठोपाठ वर आलो... तो पाण्याबाहेर येऊन ठसके देत होता. हसण्यामुळे पाणी त्याच्या तोंडात शिरलं होतं अन् त्याची अशी अवस्था झाली होती. डोळ्यांत पाणी आले होते, तरी चेहऱ्यावरचे हास्य होते तसंच होते.

"पिराजी - ही बघ - मजा तुझ्यासाठी, काय आणलंय ते -"

पिराजी केव्हाच पाण्याबाहेर आला होता. कपडे वगैरे करून तयार झालेला होता. कालवं पाहताच त्याच्या तोंडाला पाणी सुटले. माकडासारख्या टणाटणा उड्या मारीत तो आमच्याजवळ आला. कालवं घेवून कुऱ्हाडीच्या धारेने उकलण्याच्या तयारीला लागला.

सूर्य बराच वर आला होता. ऊनही बऱ्यापैकी तापले होते. दुर्बिणीच्या काचेच्या मदतीने विस्तव पेटवणं सोपं होतं.

नारळाच पाणी, खोबरे आणि भाजलेली कालवं - अशी आमची न्याहरी सुरू झाली.

• • •

# पाच

न्याहरी करता करता पुढं काय करायचं? या विषयावर आमच्यात बरीचशी वादावादी अन् थोडीशी चर्चा झाली. पिराजीचं म्हणणं होतं, 'गार सावली बघून दुपारपर्यंत झोप काढावी - मग जेवण करावं - मग पुन्हा झोप काढावी - तोपर्यंत रात्र होईल - रात्रीचे जेवण उरकून पुन्हा झोप -'

जगूजी त्याच्यावर जाम वैतागला शेवटी हातातल्या काठीच्या जोरावर पिराजीचा विचार मोडीत काढला. मग सर्वानुमते असं ठरलं की, "अगोदर आपण या बेटाचे संपूर्ण निरीक्षण करावे.

सगळेजण उठलो - जे काही आमचं थोडंफार सामान होतं ते जवळच्याच एका दगडाच्या खोबणीत लपवून ठेवलं. पुढेही आम्ही आमचं कुठलंही सामान लपवून ठेवण्यासाठी त्याच खोबणीचा उपयोग करणार होतो. आता अज्ञात प्रदेशातून, झाडी-जंगलातून जायचे-भटकायचे म्हटल्यावर संरक्षणाची काही तरतूद करावयास हवीच. मग पुन्हा थोडा विचार विनिमय झाला. हत्यार म्हणून आमच्याजवळ एकमेव कुऱ्हाड होती. दुसऱ्या

दोघांसाठी तेथल्याच झाडांचे चांगले मजबूत दोन सोट आम्ही काढून घेतले. एखादे अनपेक्षित संकट आले तरी बचावाची थोडीफार तरतूद झाली होती. प्रसंगी शिकारही मिळवता आली असती. पेटवलेली शेकोटी पुरती विझवली आणि आम्ही निघालो.

आमची संशोधन मोहीम समुद्र किनाऱ्या किनाऱ्यानं सुरू केली. थोड्याच वेळात आम्ही एका दरीच्या तोंडाशी येऊन ठेपलो. त्यातून एक छोटीशी नदी झुळझुळत वाहात होती. समुद्राकडे पाठ करून, त्या नदीच्या काठाकाठाने आम्ही पुढे सरकू लागलो, जरासे पुढे येताच आम्हाला अलौकिक असं निसर्गाचे रूप दिसू लागले. असंख्य झाडे, फुले, पक्षी, अधूनमधून फळझाडांवरून उड्या मारणारी माकडे, हे बघताबघता आमचा थकवा पार कुठल्याकुठे पळाला होता. त्या नदीच्या काठाकाठानच डोंगरमाथा गाठावा, असं आम्ही ठरविले.

जगूजी सर्वात मोठा धीट, अनुभवी असल्यामुळे खांद्यावर कुऱ्हाड टाकून मोठ्या रुबाबात आघाडीवर राहिला होता. त्याच्या मोगोमाग हातात सोटके घेतलेले आम्ही दोघे.

बराच वेळ आम्ही आमच्याच नादात चालत राहिलो होतो. मध्येच केव्हातरी माझ्या ध्यानात आले की, माझ्या हातातलं सोटकं कुठेतरी राहून गेलंय.

वर चढत चढत, आम्ही डोंगराच्या पायथ्याशी येऊन पोहोचलो. काही वेळ विश्रांती घेतली आणि डोंगर चढण्यासाठी उठून उभे राहिलो. इतक्यात कसला तरी गडगडण्याचा आवाज आमच्या कानावर आला. आम्ही दचकलो. सावध होऊन जागच्याजागी थबकलो.

पिराजी जागच्याजागी, हातातलं सोटकं घट्ट पकडीत ओरडला, "ए! कोणंय ?"

परंतु कुठूनच, काही उत्तर आलं नाही. जगूजीनं हातातली कुऱ्हाड अधिकच घट्ट पकडली. बाजूच्या वडाची पाने दूर सारून पलिकडे - आवाजाच्या दिशेने पाहू लागला. पलिकडे कोणीच नव्हतं पण आवाज मात्र क्षणाक्षणाला वाढत होता. अधिक भयानक होत होता आम्ही तिघेही सावध झालो आणि एका रुंद खोड असलेल्या वृक्षाआड लपून राहिलो. मनात नाही नाही ते विचार येत होते. हिंस्र पशूंपासून नरभक्षक मानवापर्यंत. क्षणभर डोळ्यापुढे असेही दृश्य तरळून गेले की, आमच्या भोवती त्या लोकांनी फेर धरलाय, नाच गाणे सुरू आहे आणि आम्हाला जिवंत जाळण्याची तयारीही पूर्ण झालीय खोटं नाही सांगत

माझ्या छातीतली धडपड कमालीची वाढली होती. हातापायाला घाम फुटत होता. अन् इकडं क्षणाक्षणाला तो भीषण आवाज वाढतच होता; वाढतच होता. अन् अचानक –

एखाद्या अवाढव्य रानटी पशूनं लांब लांब झेपा घेत... मार्गात येणाऱ्या वेली-वृक्षांची मोडातोड करीत पुढं दौडावं, असला काहीसा विलक्षण आवाज आमच्या कानावर आदळू लागला; अन् क्षणार्धात एक भली मोठी शिळा कडाड् कडाड् आवाज करत आमच्या जवळच येऊन आदळली. पोठोपाठ असंख्य लहान मोठे दगड-धोंडे, पालापचोळा अन् धूळ उडत आली.

"हात्तेरी की! शिळा" - कपाळावर जमलेला घाम आपल्या कुडत्याच्या बाहीने टिपत पिराजी उद्गारला. "मला तर वाटलं होतं की कुठली तरी रानटी माणसांची टोळीच आपल्यावर चाल करून येतेय"-

"हूं! पण आपलं नशीब थोर! हिच शिळा जर आपल्यापैकी कुणाच्या अंगावर आदळली असती तर..."

ह्या प्रसंगातून आम्ही एक धडा शिकलो. यापुढे हा खडकाळ प्रदेश टाळून या डोंगरावर जायचं. कदाचित् मघाशी कोसळणाऱ्या शिळेचा आवाज आम्हाला ओळखूनही आला असता. परंतु भयाने आम्ही विचारच करू शकलो नव्हतो.

चढ चढण्यास सुरुवात केली. जगूजीला एक परिचित वृक्ष दिसला अन् आम्हा सर्वांनाच आनंद झाला. त्या वृक्षाचा एकूण आकारच मोठा आकर्षक होता. जगूजी म्हणाला, "याला भाकरीचं झाड असं म्हणतात."

"भाकरीचं झाडं?"

"हो हो भाकरीचं झाड या समुद्र बेटांतलं हे एक अत्यंत उपयुक्त असं झाड आहे हे. याला वर्षातून दोन-तीन वेळाच फळं येतात. दिसायला हे फळ भाकरीसारखं गोल-किंचित फुगीर असं असतं. रानटी मानवाचं ते प्रमुख अन्न असतं.

"अच्छा, म्हणजे आपल्या ह्या साम्राज्यात सर्व सुखसोयी अगदी हात जोडून आपल्या सेवेसाठी सज्ज आहेत. म्हणायच्या." पिराजी म्हणाला, "तहान लागली - काढा शहाळं, भूक लागली - काढा भाकरी फळ - "

"तू चेष्टा करू नकोस. हे झाड तसं फार उपयुक्त आहे. या झाडाचा चीक हे जंगली मानव होड्यांना फासतात. त्यामुळे लाकडावर पाण्याचा परिणाम होत नाही. याच्या कोवळ्या सालींचं कापड विणतात आणि लाकूड चिवट असल्यानं

घरबांधणीसाठी फार उपयुक्त असतं. मित्रांनो, आपण जराशी अक्कल वापरली तर आपल्याला इथं कशाचीही कमतरता जाणवणार नाही." तो क्षणभर थांबला - म्हणाला, "मला ठाऊक नसलेली परंतु आपल्याला उपयोगी पडू शकतील अशी अजूनही खूप झाडं इथं असतील. आपल्याला त्यांची माहिती करून घ्यायला हवी मात्र - "

"जशी आपली आज्ञा महाराज - आपण वयाच्या मानानं खूपच ज्ञान प्राप्त करून घेतलेले आहे. आपण मोठे हुशार कुमार आहात. अशीच प्रगती चालू ठेवाल तर एके दिवशी थोरल्या महाराजांप्रमाणे..."

पण जगूजीने त्याला पुढे बोलूच दिले नाही. त्याच्या तंगडीत आपला पाय अडकवून त्याला एकदम भुईसपाट करून आस्मानच बघायला लावले.

आता आम्हाला डोंगराच्या माथ्यावर पोहोचण्याची घाई असल्यामुळे ती भाकरीची फळं तोडण्याचा कार्यक्रम पुढं ढकलावा लागत होता.

भाकरीचं झाड सापडणं, ही फार सुदैवी घटना होती. पोटाची काळजी राहिली नव्हती. त्या आनंदाच्या भरातच आमची पावलं जलद पडू लागली होती. डोंगर चढण्याचे श्रमही जाणवत नव्हते. थोड्याच वेळात आम्ही डोंगर माथ्यावर जाऊन पोहोचलो. आजूबाजूच्या निसर्गावर तर बेहद खूष झालो होतो. जिकडे पहावे तिकडे हिरवी गर्द झाडेच झाडे, कधीकधी थोडी फिकट हिरवी, कधी तांबूस हिरवी, कधी इवली इवली पाने तर कधी भली मोठी सागाच्या पानासारखी पाने, मधून अधून झुलणारे रंगीबेरंगी फुलांचे झुपके. परिचित, अपरिचित. रंगीबेरंगी रसदार फळं... दुसरे काहीच नाही. परंतु हे फक्त डोंगरमाथ्यापर्यंतच डोंगरा माथा मात्र उघडा बोडखा... दगड धोंड्यांनी भरलेला होता.

वर चढत असताना, वाटेत कुणीतरी कुऱ्हाडीचा उपयोग करून एक झाड तोडून टाकले होते. बुंधा तसाच होता. याचाच अर्थ असा होता की, या बेटावर आमच्याही अगोदर कुणीतरी येऊन गेलेले होते! म्हणजे कुठंतरी मानवी वस्ती असण्याचीही शक्यता होती. त्या तुटक्या बुंध्याकडे नीट निरखून पाहिल्यावर आम्हाला काहीसा कुजलेला असा भाग आम्हाला दिसला. ते झाड बऱ्याच वर्षापूर्वी कुणीतरी तोडलेलं असावं. म्हणजे याक्षणी या बेटावर, निदान आमच्याशिवाय इतर कुणी मानव असण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच.

"हा काय प्रकार असावा हे. माझ्याही ध्यानात नाही येत " आपल्या हातातल्या कुऱ्हाडीने त्या बुंध्यावरची बुरशी खरडीत जगूजी म्हणाला, "मला

तर असच वाटतंय॰की, हे रानटी लोकांचच काम असणारं पण त्यांनी कशासाठी तोडलं असावं, हे कळायला काही मार्ग नाही. पण अरेच्या हे... हे काय ?"

एकाएकी तो गप्प झाला. अत्यंत काळजीपूर्वक त्याने त्या बुंध्यावरची बुरशी, शेवाळे खरडून काढले होते. त्याखाली दडलेली अक्षरे आता चांगलीच स्पष्ट दिसू लागली होती. परंतु त्या खुणा जरी स्पष्ट होत्या, तरी ती अक्षरे मात्र तितकीशी अचूक अशी वाचता येण्यातली नव्हती. तो मजकूर काय असावा, हे शोधण्याचा आम्ही बराच वेळ कसून प्रयत्न केला, पण शून्य. अखेरीस दिवस वर सरकत चालण्यानं त्या एकाच गोष्टीत आम्हाला वेळ वाया घालवून चालण्यासारखं नव्हते.

डोंगर माथ्यावर पाऊल ठेवलं त्यावेळी त्या भागातल्या सर्वात उंच अशा ठिकाणी आम्ही असल्यासारखं वाटत होतं. आम्ही उभे होतो तेथून एखादा नकाशा पहावा, तसे त्या बेटाचं दृश्य दिसत होते. आम्ही बसलो होतो, तो डोंगर एक हजार फूट उंच असावा, समोरचा पाचशे फूट. असंख्य लहान मोठे नाले-ओढे, एक-दोन लहान मोठ्या नद्या... खळखळाट करीत वाहात होत्या. बेटाचा आकार साधारण गोल असाच होता. रुंदी दहा एक मैल असेल अन् घेर सरासरी पस्तीस-चाळीस मैलांचा असेल सभोवार गोलाकार असा चकाकत्या वाळूचा पट्टा पसरलेला होता. आणि त्या बेटाचे संरक्षण करण्यासाठी खडकाळ तटबंदी होती. नारळाची झाडे तर असंख्य होती.

कितीही वेळ त्या दृश्याकडे बघत बसलो असतो तरी मन तृप्त कधीच झालं नसतं. सूर्य पश्चिमेकडे झुकू लागला होता. आम्ही उठलो. खाली उतरू लागलो. त्या परतीच्या प्रवासातही कुऱ्हाडीने तोडून टाकलेले लाकडाचे चौकोनी तुकडे आम्हाला आढळले. हे सुध्दा कुजू लागले होते. मानवाच्या वस्तीच्या हा दुसरा पुरावा पुढे आला होता. त्याचबरोबर काही चतुष्पाद प्राण्यांच्या पावलांचे ठसेही दिसले होते. त्या नव्या की जुन्या हे सांगणं मात्र थोडं अवघड होतं. पण त्या ठशांमुळे तोंडाला पाणी सुटलं होतं. मांसाचा आस्वाद मिळण्याची शक्यता उत्पन्न झाली होती. मनात आपोआपच आशा फुलू लागल्या होत्या. त्या नादातच आम्ही आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी परतलो.

निद्रेची आराधना करता करता असा निष्कर्ष काढला की, इथं मानवाची वस्ती पूर्वी असेल, पण आता नाहीय. त्यामुळे रानटी लोकांची फारशी भिती

बाळगण्याचे कारण नाही. ह्या विचाराने प्रत्येकाच्याच मनांत बराच धीर आला आणि त्या विचारांच्या नादात कधी झोप लागली तेही कळले नाही.

रात्री अचानक पावसाची भूरभूर सुरू झाली अन आम्हाला सर्वात प्रखर जाणीव कशाची झाली असेल तर ...आपल्याला घर हवं - छप्पर असलेलं !

● ● ●

# सहा

रात्र कशीबशी काढली.

सकाळी उठल्यापासून आम्ही उद्योगाला लागलो. फांद्या, पाने, झावळ्या ह्यांच्या मदतीने आम्ही त्यातल्या त्यात सुरक्षित असे घर बनवले. पण ते काय एका दिवसात मात्र झाले नाही. किती दिवस लागले. तेही आम्ही मोजले नाहीत.

इतक्या दिवसांत आम्हांला चुकूनही रानटी मानव नजरेस आला नाही किंवा एक जहाजही दिसलं नाही. आमच्या सुखसोयी आमच्या आम्हालाच करून घेणं भाग होतं. जगूजीने वल्ह्याला असलेली लोखंडी कडी ठोकून ठाकून चपटी करून एक ओबड-धोबड सुरी तयार केली होती. धार लागावी म्हणून तिला दिवस दिवस खडकावर घासत राहायचा. पिराजीनं डोक लढवून त्या कातडी वादीचा मासेमारीसाठी गळ तयार केला होता. टोकाशी कालवाचा तुकडा बांधायचा. तो मासा गिळू लागला की हिसका मारून माशाला पाण्याबाहेर खेचायचा. पण गळ फार लहान असल्यामुळे किरकोळ असेच मासे मिळायचे. आमच्या जवळ होडीही नव्हती. नाही तर जराशा खोल

पाण्यांत गेलो असतो. मोठी शिकार मिळाली असती.

एके दिवशी पिराजी जरा चिडूनच आला. "माफ करा मित्रांनो, मला आता हे असले टिल्लू टिल्लू मासे पकडत बसायचा खूप कंटाळा आलाय - तुमच्या पैकी कुणीतरी मला खोल पाण्यात घेऊन येत असेल, तर चला... देव मासासुद्धा पकडून दाखतो"

"खरेच पिराजी. मला तुझी दया येतेय. माझ्या जर पूर्वीच हे लक्षांत आलं असतं, तर तुझी अडचण केव्हाच दूर केली असती मी -" हे बोलताना जगूजी समोर पडलेल्या एका ओंडक्याकडे एकटक पाहात होता - "आपण एखादी होडीच तयार केली तर?

"पण त्याला फार दिवस लागतील"

जगूजी पुन्हा विचारात पडला, "हां! सापडली युक्ती राव! तो ओरडला. "आपण एक झाड तोडू मोठं आणि त्याचं खोड सोडू पाण्यात - झाली आपली होडी. मासे पकडायच्यावेळी फक्त तू त्यावर जाऊन बसायचंस - घोड्यावर बसल्यागत -"

"यापेक्षा एखादा छोटा तराफा करता नाही का येणार?" मी विचारले.

"येईल की! पण दोऱ्या कुठल्या आणायच्या तो बांधायला? रानातून आपण काही वेली मिळवू शकू म्हणा, पण तूर्त झाडावरच आपण वेळ भागवू -"

आम्ही लगेच उठलो. किनाऱ्याच्या जवळपास आमच्या उपयोगी पडू शकेल असं झाड शोधू लागलो. तसलं झाड सापडायला फारसा वेळ लागायचं कारण नव्हतंच. जगूजीनं अंगातला कुडता काढला आणि झाडाच्या बुंध्यावर दणादण कुऱ्हाडीचे घाव घालायला सुरूवात केली. तो दमला की आम्ही कुऱ्हाड चालवत असू. एका पाठोपाठ एक बसणाऱ्या घावांमुळे थोड्याच वेळात संपूर्ण ते झाड कडा कडा आवाज करीत खाली कोसळले.

"हुर्रे! हुर्रे! चला. आता त्याचं डोकं उडवू या - " जगूजी ओरडला. बुंध्यापासून सतरा-अठरा फूट जागा सोडून त्या झाडाच्या वरच्या सगळ्या फांद्या तोडून टाकल्या. नुसते लांबच्या लांब खोड शिल्लक ठेवले. मग दोन-तीन मजबूत फांद्यांच्या दांड्यावरून त्या खोडाची ढकलगाडी करीत करीत एकदाचे ते पाण्यात आणून सोडले.

अशा तऱ्हेने आमची होडी यशस्वीरित्या पाण्यावर तरंगू लागली. तोंडलेल्या दांडक्यांनाच आकार देऊन वल्ह्यांचा प्रश्न तात्पुरता तरी मिटवून घेतला होता

आणि मग मोठ्या दिमाखात त्या गलबतावर आम्ही विराजमान झालो. आतापर्यंत तरी कोणते विघ्न आलेले नव्हते. पण आमच्यासमोर आता वेगळाच प्रश्न होता. आमची होडी होती गोल आकाराची. आम्ही तिच्यावर बसलेलो असताना स्वत:भोवती तिला गोल फिरून देणं आणि स्वत:चा तोल सावरणं वाटतं तितकं सोप नव्हतं. त्या ओंडक्यावरून आमचे दोन्ही पाय दोन्ही बाजूस लोंबकळतेच राहणार होते. त्याला मात्र काहीच इलाज नव्हता.

आमचा प्रवास सुरू झाला. अर्धा-एक तासानंतर आम्हाला तोल सावरून कसं बसायचं हे नेमकं कळू लागलं - फारच सोपं वाटू लागलं.

मग पिराजीनं आपल्या हातातलं वल्ह ठेवलं बाजूला आणि मासे पकडायचा गळ हाती घेतला.

"मित्रांनो - सावध असा आता... कदाचित् मोठा मासा गळाला लागण्याची शक्यता आहे - " पिराजीची गडबड सुरू होतीच." सावध रे ... सावकाश... सावकाश... वल्हवा! तो बघ चांगला हातभर लांबीचा मासा आला. आला... शाबास! हात्तेरी की - गेला वाटतं -

" येईल - पुन्ह येईल..." जगूजी म्हणाला.

" तो बघ... आला... परत आला... अंहं! गळाला तोंडच लावायला कबूल होत नाहीय - "

" अजून थोडा खाली धर अन् तोंड लावलं की लागलीच हिसका मार - पण सांभाळून " जगूजीनं सूचना केली.

पण तो मासा काही आमच्या नशिबात नसावा. जगूजी म्हणाला, " आपण अजून थोडं पुढं जाऊ... कदाचित् दुसरी शिकार मिळेल!" जगूजीनं वल्हं मारलं. आमची होडी थोडी पुढं सरकली नाही तोच, खडकाखालून, एक भलं मोठं डोकं अन् एवढंसं शरीर असलेला मासा पटकन पुढं आला. क्षणार्धात गळाचं कालव गिळलं अन पळून गेला.

आम्ही सगळेच हताश झालो होतो.

पिराजीनं नवं कालव गळाला लावलं. पुन्हा तोच मासा गळाशी आला. ह्यावेळी पिराजी सावध होतो. तो कालवं त्या माशाच्या तोंडात गेलं असेल नसेल इतक्यात त्यानं गळाला हिसका मारला.

धडपड करीत तो मासा वर येताच त्याला पाहण्यासाठी आम्ही पुढं झुकलो अन् तो ओंडका एका अंगाला एकदम कलंडला. आम्ही सगळे जग

पाण्यांत गटांगळ्या खाऊ लागलो.

पाण्यातून धडपडत वर येणाऱ्या उंदरासारखे आम्ही तिघेही वर आलो. आमचे आम्हीच खिदळत होतो. काही मिनिटातच ऑम्ही पुन्हा त्या ओंडक्यावर स्वार झालो. वल्ही उचलली, परंतु एवढ्या गडबडीतही पिराजीनं हातच्या आलेल्या त्या माशाला निसटू दिलं नव्हतं. आपल्या खिशात त्याला कोंबलं आणि गळाला नवे आमिष लावून गळ पुन्हा पाण्यात सोडला.

आमचे सगळे लक्ष त्या गळाकडे लागले असताना आमच्यापासून थोड्याच अंतरावर उठलेल्या लाटेने आमचे लक्ष वेधून घेतले. तो एक मोठा मासा असावा, त्याला पकडण्याच्या हेतूने पिराजीने ओरडून होडी त्याच्या दिशेने घ्यायला हुकूम सोडला. परंतु त्याचा हुकूम अंमलात आणण्याऐवजी जगूजी सावध स्वरात म्हणाला, "पिराजी - वेडेपणा करून नकोस. गळ वर घे झटकन - तो देव मासा आहे!"

हे शब्द ऐकताच भयाने आमची बोबडीच वळली. आमचे पाय पाण्यातच लोंबत होते आणि ते वर घेताच ओंडका नक्कीच उलटणार होता. पिराजीनं ताबडतोब गळ आणि वल्ह वर उचलून घेतलं. तिघही सगळी ताकदपणाला लावून किनाऱ्याकडे होडी नेण्यासाठी. वल्ही मारू लागलो. परंतु माशाच्या आशेने किनाऱ्यापासून खूपच आत आलो होतो. ओंडकाही भक्कम जड असल्यानं हवी ती गती पकडीत नव्हता. तो देवमासा आता आमच्या भोवती गिरक्या घेत होता; भक्ष्याभोवती श्वापदानं घालाव्यात तशा! त्याचे ते तीक्ष्ण दात बघूनच आमच्या तोंडचे पाणी पळाले होते. त्याच्या त्या घिरट्या घालण्याच्या गतीवरून क्षणभर असं वाटलं की, कदाचित् त्याने आमच्यावर हल्ला करण्याचा विचार रहित केला असावा. जगूजी सारखा 'वल्ही जोरात मारा' म्हणून दम देत होता. इतक्यात तो ओरडला - "तो पाहा! आला! सावध राहा! आणि दुसऱ्याच क्षणी त्या अजस्र माशानं आमच्या जवळ येऊन आपला विक्राळ जबडा वासला. त्याने घाबरावे व दूर जावे म्हणून आम्ही तिघांनीही वल्ही जोरजोरात आपटून एकच गिल्ला केला. तोही जरा बावरला अन् दूर गेला. पण तेवढ्यापुरतंच. पुन्हा त्याच्या घिरट्या सुरू झाल्या.

"पिराजी, तुझ्याजवळचा मासा फेक त्याच्या अंगावर!" दबलेल्या पण घाईच्या स्वरांत जगूजी ओरडला, "अजून थोडा वेळ जर तो आपल्यापासून दूर राहिला, तर आपण नक्कीच किनारा गाठू शकू!"

पिराजीनं शक्य तेवढ्या दूर, तो मासा त्या देव माशाच्या अंगावरून भिरकावला अन् जोरजोरात वल्ही मारायला सुरूवात केली. त्या फेकलेल्या माशापाठी

तो देव मासा धावला. तो मासा पाण्यात पडताच देवमाशानं पाण्यात डुबकी मारली आणि दुसऱ्याच क्षणी त्याचं पांढरं पोट आमच्या नजरेस पडलं! 'भक्ष्य पकडताना देवमासे असेच आपल्या एका अंगावर वळतात, कारण त्यांचं तोंड अगदी डोक्यासमोर नसून, जरा खाली पोटाकडे असतं.' जगूजीने तेवढ्यात माहिती पुरवली. पुन्हा क्षणार्धात त्याचे तोंड पाण्यावर आलं आणि त्याच्या जबड्यात असलेल्या करवती दातांची रांगच्या रांग आमच्या अंगाचा थरकाप उडवून गेली. त्याच्या हालचाली वरून तो आता नक्की आमच्यावर हल्ला करणार अशी आमची खात्री पटली होती.

"तुमची वल्ही थांबवा..." जगूजी ओरडून म्हणाला. तो आपला आता पाठलाग करणार... आता फक्त मी सांगतो तसं करा... तुम्ही फक्त ओंडक्याचा तोल सांभाळायचा. दुसरं काही नाही. बाकीचं मी बघतो."

मी व पिराजी सावरून बसलो. जगूजीच्या शहाणपणावर आणि धैर्यावर आमचा पूर्ण विश्वास होता. ह्या संकटातून तोच फक्त मार्ग काढू शकत होता.

जगूजी दगडासारखा स्तब्ध बसून, हातातलं वल्हं उंच करून, सगळे धैर्य एकवटून, पूर्ण निश्चयाने त्या देवमाशाकडे टक लावून पाहात होता. आपला पाय तसाच पाण्यात लोंबकळत ठेवला होता. नेमकं त्यांच दिशेने तो देवमासा आपला विक्राळ जबडा ताणून त्या दिशेने झेपावला. मी भितीने किंचाळलोच! क्षणभराने तो मासा पाण्याआड झाला पण दुसऱ्याच क्षणी पुन्हा आपला जबडा वासून तो जगूजीवर चाल करून आला. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच जगूजीनं आपला पाय वर घेतला आणि पलिकडे टाकला. देवमाशाचे तोंड ओंडक्याशी आले... त्याने जबडा वासला... त्याच क्षणाला जगूजीनं मोठ्या धाडसानं अन् चपळाईनं आपलं वल्हं त्याच्या त्या जबड्यात खोलवर खुपसलं! त्या धक्क्यानं आम्ही तिघही पाण्यात कलंडलो. पण धडपडत पुन्हा वर आलो. धापा टाकीत हात मारू लागलो.

तो देव मासा दूरवर निघून गेला होता. किनाऱ्यावर पोहचेपर्यंत आम्ही खूपच दमून गेलो होतो. त्या मृत्युच्या दर्शनानं अजूनही आमची छाती धडधडत होती.

मासा आमच्या पोटात जाण्याऐवजी आम्हीच माशाच्या पोटात जाणार होतो. देवमाशाबरोबरचा तो सामना म्हणजे त्या बेटावर पाय ठेवल्यापासून समोर आलेलं पहिल-वहिलं संकट होतं! आपोआपच त्या घटनेचा आमच्या मनावर

खूप खोलवर परिणाम झालेला होता आणि पूर्वी जसे समुद्रात मनमुराद डुंबायचे, तसं आता डुंबू शकत नव्हतो. कारण मनात असलेली भिती... तो किंवा इतर दुसरा कोणताही मासा आमच्यावर हल्ला करू शकतो. सकाळी डुंबताना समुद्रबागेचं दर्शन आणि त्यात भटकणं बंद झालं होतं. पूर्वी जगूजी खोलवर पाण्यात जायचा आणि त्यातल्या एखाद्या झुडूपावर, चारपायाच्या बैठकीवर... आसनावर बसल्यागत बसून राहायचा. तिथं बसून माझ्याकडे पाहात मुद्दामच तोंड वेडवाकडं करायचा. मला हसू फुटायचं आणि एखाद्या कुपीचं झाकण वेगानं वर उडावं तसं मी वर पृष्ठभागावर यायचो. मला हसूंच आवरायचे नाही, पण ते आता सगळं संपलं होतं. जगूजीनं सगळ्यावर बंधनं आणलेली होती. पाण्यात जायचं; पण तेही अगदी कमीत कमी वेळ. जास्त खोल नाही. जरुरीपुरतंच पाण्यात राहायचं. आता सगळ्याच आनंदावर पाणी पडलं होत.

अडचणी, संकटे आल्याखेरीज मनुष्य त्यांच्या निवारणाचा कधी विचारच करीत नसतो आणि एखादी गोष्ट साध्य करण्याची तीव्र इच्छा असली की, उपाय नक्की सापडतोच.

जेथे समुद्रतळाचे सौंदर्य असेल आणि जेथे देवमाशांसारखे अजस्र मासे फिरकू शकणार नाहीत अशा जागेच्या शोधात आम्ही लागलो आणि सुदैवाने खडकांच्या बंदिस्त भिंती आड असलेली तलावासारखी खोल जागा आम्हाला सापडलीही. या जागेत आत शिरण्याचं खूपसं अरूंद आणि उथळ मुख असल्यानं मोठ्या आकाराचा कोणताही मासा आत प्रवेश करू शकणार नव्हता. आमची भिती खूपच कमी झाली होती.

या ठिकाणीही तळाशी तशीच बाग होती. याच्या तळाशी असलेली प्रवाळांची झाडं अधिक चित्रविचित्र होती. समुद्र वेलींची जाळीही अधिकच गर्द, मोहक रंगाची होती. पाणी खोल असूनही विलक्षण स्वच्छ, पारदर्शक होतं. आता एक नवाच छंद जडला होता. प्रवाळांच्या किटकांचे निरिक्षण करायचे. त्यांची आपली इवली इवली घरे बांधण्याची अविरत धडपड चाललेली असायची. त्या अविरत धडपडीतूनच सभोवारचे खडक आणि त्या खडकांचे डोंगर तयार झाले होते. सगळेच आश्चर्य कारक होते.

• • •

# सात

अद्याप तरी आम्ही सूर्यास्त झाला की, झोपायच्या तयारीला लागत असू. रात्री जागून काम करण्याची कधी गरजच भासली नव्हती. दिवसभराच्या भटकण्याने आणि उद्योगाने इतके थकून जायचो, की कसली ताकदच उरायची नाही. दिवसभर उद्योग चालायचा... नारळ आणणे, भाकरीची फळे आणणे, घराची देखभाल करणे आणि आजूबाजूचा प्रदेश बघत भटकणे. ह्यातच सगळा वेळ आणि ताकद संपून जायची. परंतु एके रात्री मात्र जगूजीला जागून काम करण्याची इच्छा झाली आणि दिवटीची गरज निर्माण झाली.

"ह्या धडाडून पेटलेल्या शेकोटीचा उजेड नाही का रे पुरेसा होणार तुला ?"

"हो पुरेल की... जगूजी म्हणाला ! "पण त्यापासून निर्माण होणाऱ्या उष्णतेचं काय ?"

"हां - तेही खरंच - मी ते विसरलोच होतो."

माझ्या डोक्यात एका झाडाचा शोध घेण्याचं बरेच दिवसापासून आहे - रानटी लोक

दिवटीसारखा एका फळाचा उपयोग करीत असतात. मला चांगली माहिती आहे त्या फळाची " जगूजी म्हणाला.

"मग का नाही करीत तसं? आणि इतके दिवस हे गुपित कां ठेवलं होतंस? " पिराजीनं विचारलं.

"एक तर अद्याप ते फळ माझ्या नजरेस पडलेलंच नाहीय आणि दिसलंच तर हेच ते फळ म्हणून नक्की नाही सांगता यायचं!"

"पण आपण शोध घ्यायचाच -"

"मला तसं नक्की आठवत नाहीय रे - पण दिवलीचं झाडं असतं हे नक्की. आपल्या रातांब्याएवढं फळ असतं ते, अन् त्या झाडाची पानं हिरवी नसून पांढरी असतात. पण नक्की नाही आठवत"

"काय? पांढरी पानं असतात?" पिराजी म्हणाला. "तसलं झाड मी आजच पाहिलंय."

"खरं सांगतोस? " चटकन् आपली कुऱ्हाड उचलीत जगूजी म्हणाला, "चल कुठं पाहिलंस ते दाखव पाहू."

आम्ही तिघही निघालो. दाट झाडीतून वाट काढीत झपाट्यानं आम्ही चालत होतो. थोड्याच वेळात पिराजीनं त्या पांढऱ्या पानांच्या झाडाजवळ आम्हाला नेऊन उभं केलं. जगूजीनं त्या झाडाचं बराच वेळ निरिक्षण केलं. त्या झाडाची पाने खरोखरीच चांदीसारखी पांढरी पांढरी होती. फळांनी नुसते ते वाकलेले होते. आम्ही आधाशासारखी ती फळे तोडू लागलो. खिसे भरल्यावर जगूजी म्हणाला, "पिराजी, आता त्या नारळीवर चढ आणि त्याच एक झाप तोडून टाक खाली."

ते झाड बरंच उंच होतं. नारळीवर चढायची पिराजीला सवयही नव्हती फारशी. झाप काढताना पुरती दमछाक झाली त्याची. आतापर्यंत तो केवळ छोट्या बुटक्याच नारळीवर चढून नारळ काढीत असे. त्या झापांची लांबी आणि त्याचा भक्कमपणा नवलात पाडणारा होता; त्याशिवाय अजून एक नवलाची गोष्ट म्हणजे त्या फांद्यांच्या बुंध्याशी कापडासारखं काही तरी गुंडाळलेले होतं. त्यामुळेच त्या फांद्या आपोआप-केवढाही वारा आला तरी तुटून पडत नसणार. ते कापड खरोखरीच एखाद्या खरबरीत कापडासारख होतं... मागावर विणल्यासारखं. झाडावरून काढलेला तो तुकडा दोन वार लांब अन एक वार रूंद होता. उपयोगी पडेल कधी तरी, म्हणून तेही बरोबर घेतलं.

जगूजीनं झापाच्या दोन-चार फांद्या काढल्या आणि मधल्या काड्या -

शिरा कायम ठेऊन पानं काढून टाकली. मग शेकोटी पेटवून त्यात ती फळं चांगली शेकून घेतली अन् मग त्याची साल काढून टाकली. जवळच्या काटकीने त्या फळांना भोकं पाडली. मग ती फळं सरळ एका चिरगुटात ओवली आणि वरच्या फळाला विस्तव लावला. त्याबरोबर ती पेटली आणि संथपणे जळू लागली. स्वच्छ प्रकाश पडला. उष्णता मात्र अजिबात नव्हती. आम्ही आनंदाने नाचायचेच फक्त बाकी होते.

"मित्रांनो," हातातली दिवली विझवीत जगूजी म्हणाला; "आता तासाभरात सूर्य मावळेल. वेळ वाया घालवायचा नाही. मी एक भक्कम फांदी आणतो, तिरकमठा करण्यासाठी... आणि तुम्ही तुमच्यासाठी भक्कम अशी सोडकी तयार करा."

जगूजी आणि पिराजी उद्योगाला लागले मी मात्र हातात कापड घेऊन तेच निरखीत बसलो होतो. पिराजीनं आम्हा दोघांसाठी सोटके करून आणले.

हळूहळू अंधार पसरू लागला होता. आम्ही नवीन दिवली पेटवली. दोन काठ्यांचे गुणिले चिन्ह करून त्यावर ती आडवी ठेवली आणि पाचोळ्याच्या बिछान्यावर बसून उद्योग सुरू केला.

हातातले लाकूड तासता तासता जगूजी म्हणाला, "हा तिरकमठा आणलाय, कुणी हात नाही लावायचा; पिराजी तुझं काय चाललंय रे तिकडे?"

पिराजी आपल्या काठीच्या टोकाला, त्या वल्ह्याला असलेल्या पत्र्याची शंकूच्या आकाराची टोपी करून बसवण्यात दंग होता.

"सोटक्यापेक्षा भाला अधिक उपयुक्त ठरेल - नाही का?"

"छान! पिराजी खरंच तुझी कल्पना खरंच छान आहे - मी मात्र ह्या कापडाची गोफण करण्याच्या विचारात आहे; तसा माझा नेम अचूक आहे - असं माझी आई नेहमी म्हणायची!"

आम्ही तिघेही आपापल्या उद्योगात गढून गेलो. जराशाने अचानक कुठून तरी एक विलक्षण चमत्कारिक आणि भयंकर अशी किंकाळी आमच्या कानावर आली. आम्ही चांगलेच दचकलो. आम्हाला वाटले की किंकाळी समुद्रावरून आलीय. आम्ही तसेच उठलो आणि समुद्राकडे पळत सुटलो. परत ती किंकाळी ऐकू आली. तो आवाज आलेल्या दिशेकडून वारा जोरदारपणे वाहात होता.

"काय असेल बरे?" पिराजी कुजबुजला. आम्ही तिघेही आता एकमेकांना चिकटून उभे होतो.

"मी तुम्हाला कधी सांगितलं नाही, पण यापूर्वीही मी हा आवाज दोनदा ऐकलाय, पण आजच्या इतका मोठा, स्पष्ट नव्हता - तो आवाज. अगदीच किरकोळ, मंद, अस्पष्ट. आपल्याला भास होत असेल म्हणून मी फारसं काही लक्ष नाही दिलं आणि तुम्हीही विनाकारण घाबरून जाल... म्हणून नाही सांगितलं!" जगूजी म्हणाला.

आमची अपेक्षा होती की तो आवाज पुन्हा होईल. बराच वेळ आम्ही वाट पाहिली. परंतु कसलाच आवाज आला नाही. मग मात्र आम्ही आमच्या उद्योगाला लागलो.

पण पिराजीच्या मनातून ते गेलं नव्हतं. "आश्चर्यच नाही हे? तुमचा भुताखेतांवर विश्वास आहे का रे?" पिराजी म्हणाला.

"नाही! पण तरीही, आता जो आवाज ऐकला ना... तसले, गूढ, विलक्षण, अनाकलनीय आवाज ऐकले की मात्र थोडंसं बेचैन व्हायला होतं" मी.

"तू रे जगूजी?"

"माझा असल्या गोष्टींवर काडीइतकाही विश्वास नाही. असलं काही ऐकलं, पाहिलं की, मी त्याच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करतो. शेवटी काहीतरी किरकोळ, साधं कारण आढळून येतं. मग बेचैन कशाला व्हायचं? जाऊ द्या आता ते... हा माझा तिरकमठा तयार झालाय. तुमचं कुठपर्यंत आलंय? झोपायचं ना आता?" जगूजीनं विचारलं.

पिराजीनं आपल्या सोटक्याला पुढून चांगले टोक काढले होते आणि त्यावर पत्र्यापासून तयार केलेला फाळ मोठ्या कौशल्यानं बसवून टाकला होता. मीही मला जे कापड मिळाले होते त्याच्या धांदोट्या काढून, पीळ देऊन, पुन्हा वेण्या वळून गोफण तयार केली होती. आता प्रत्येकजण हत्यारबंद होता. पण त्या हत्यारांचा वापर करण्याची संधी मिळाल्याखेरीज त्या हत्यारांची उपयुक्तता सिध्द होणार नव्हती. त्यामुळे अगोदर त्या हत्यारांची परीक्षा घेणे अत्यावश्यक होते. त्यासाठी उद्याचा दिवस राखून ठेवला.

झोपण्यापूर्वी पुन्हा एकदा हत्यारांकडे अधिक लक्ष दिले. कुठे काही कमी नाही ना; ह्याची परत एकदा खात्री करून घेतली. उद्या उठल्या उठल्या 'शिकार सफरी'वर निघणार होतो. अगदी जय्यत तयारी आता आवश्यक होती. कितीही दमलेलो असलो तरी त्याकडे दुर्लक्ष करीत होतो. आम्हाला दिसत होती ती फक्त आमची हत्यारं!

● ● ●

# आठ

दिवस उगवला. सूर्याच्या पहिल्या किरण स्पर्शाने जगूजीला जाग आली. स्वत:ला जाग आल्याबरोबर त्याने पिराजीला आणि मला -कानाशी आवाज करून जाग आणली अन् स्वत: आंघोळीसाठी पळत सुटला. आज फारशी सवड नव्हती. जवळच्याच उथळ पाण्यात आम्ही स्नाने उरकली. एकेक नारळ काढून न्याहरीही आटोपली अन् तयारीला लागलो.

आपल्या रोजच्या कपड्याच्या व्यतरिक्त जगूजीनं आपल्या कमरेभोवती नारळाच्या कापडाचा एक पट्टाही गुंडाळला होता. त्या पट्ट्यात तो आपली कुऱ्हाड ठेवणार होता. मीही तसाच पट्टा गुंडाळला. त्यात माझा सोटका अडकवला. गोफण ही लांबच्या प्राण्यावर हल्ला करायला ठीक होती. आमने सामने आलेल्यांसाठी सोटकाच हवा. पण माझा हा सोटका मजबूत असला तरी लांब नव्हता. पिराजीनंही तसंच केलं होतं. भाला अन् सोटका ही दोन्ही हत्यारं त्यानं आपल्याबरोबर घेतली अन् आम्ही मोहीमेवर निघालो.

जंगलात नारळीची असंख्य झाडे

असल्यामुळे पोटाची चिंता नव्हती... लागली भूक की, तोडायचा नारळ. हो पण विस्तवासाठी म्हणून दुर्बिणीची काच तेवढीबरोबर घेतली होती.

आमची सफर सुरू झाली. सकाळची शांत-प्रसन्न वेळ होती. रात्री पूर्ण विश्रांती घेतलेले पक्षी आता मुक्तकंठाने कलरव करीत होते. दुरून मंदमंद समुद्राच्या लाटा फुटण्याचा आवाज येत होता. सर्वांच्या चेहऱ्यावर न लपण्याइतपत आनंद दाटला होता.

ज्या ज्या वेळी आम्ही भटकण्यासाठी म्हणून असे बाहेर पडत असू, त्या त्या वेळी पिराजी नेहमीच मध्यभागी असे. कारण त्याची आम्हां दोघांशी सतत बडबड चालू असे आणि तो मध्यभागी असल्यामुळे मी आणि जगूजी दोघेही त्याच्याजवळच आहोत, असे वाटत असे. आमच्यापैकी एकहीजण दूर गेलेले त्याला खपत नसे. गमती जमती करीत आमची सफर सुरू होती. अर्धाएक मैल गेलो असू. मग आमची वाट वळली. आता तोंडे गप्प ठेवून झपाझप आम्ही चालत होतो. तोंड जरी बंद असले तरी नजर मात्र उघडी होती. आजूबाजूचे सूक्ष्म निरिक्षण सुरूच होते. पहिली दरी संपली. दुसरी दरीही तशीच नैसर्गिक सौंदर्याने ठासून भरलेली होती. निसर्गाने आपली संपत्ती दोन्ही हाताने उधळलेली होती. क्षण दोन क्षणात आम्ही त्या दरीचे निरिक्षण केले असेल नसेल तेवढ्यात पिराजीने आम्हाला थांबायची खूण केली आणि आमचे लक्ष समोरच्या एका विलक्षण दृश्याकडे वेधले.

त्या दिशेला आपला भाला रोखीत म्हणाला, 'ते पहा... ते पहा...'

आम्ही पाहू लागलो. अचानक त्या ठिकाणी वाफ किंवा पाण्याचे तुषार यांचा कारंज्याप्रमाणे वीस-पंचवीस वाव उंचीचा लोटच्या लोट जमिनीतून वर उसळला. काही क्षणात पुन्हा नाहीसा झाला. परत काही क्षणानंतर तेच घडले. पण ह्यावेळी जमिनीवरची जागा थोडीशी बदललेली होती. आम्ही आश्चर्याने बघतच राहिलो होतो. काही क्षणांची विश्रांती घेऊन पुन्हा पुन्हा ते कारंजे वर आकाशात उसळी घेत होते. एक दोन वेळा ते तुषार आमच्या अंगावरही आले. अंगे भिजली, पण मजा वाटली. शीणलेल्या शरीराला टवटवी आली. थोडेसे धाडस करून, जे आहे ते नक्की काय आहे हे पाहण्यासाठी आम्ही पुढे सरकलो.

थोड्याच वेळात आम्ही त्या कारंज्याजवळ पोहोचलो. मोठी विलक्षण जागा होती ती. खडकाळ, तुटकी आणि जमिनीला आरपार भोके असलेली. ही भोके मात्र अंतरा अंतरावर पसरलेली होती. पाण्याचे कारंजे आता पुन्हा उसळेल म्हणून

आम्ही वाट पाहात उभे राहिलो. अचानक पायाखालच्या खडकाखालून काही तरी गुरगुरल्यासारखा किंवा घुमल्याचा आवाज सुस्कारे टाकीत 'गुड गुड' असा स्वर काढीत, जसा फुसकारे टाकीत वेगाने पुढे येत असल्यासारखा वाटला आणि क्षणार्धातच आमच्या अगदी जवळच्या भोकातूनच ते कारंजे वर उसळले. थोडक्यात बचावलो. जर बाजूला उडी मारली नसती तर त्या कारंज्या बरोबर आम्हीही वर आकाशात उडालो असतो!

पिराजी नेहमीप्रमाणेच आमच्यापासून जरासा दूरच उभा होता. आमची धांदल पाहून हसता हसता त्याच्या डोळ्यात पाणी गोळा झाले. अचानक त्याचे खिदळणे बंद पडले... कारण त्याच्या पायाखाली गुरगुरणे सुरू झाले होते.

'आता हे कारंजे कुठून उसळणार?' असे स्वत:लाच विचारीत पळण्यासाठी तयारी करीत तो म्हणाला. पण तेवढाही अवधी मिळाला नाही. फस्स्कन् आवाज झाला आणि एकदम त्याच्या दोन्ही तंगड्यांच्या मधोमध फवारा उसळला. हा चेंडूसारखावर फेकला गेला. फवारा थांबला तसा हाही खाली आदळला. सुदैव एवढेच की, तो जेथे आदळला, तेथे दाट वेलींचे जाळे होते. त्यावर अलगद झेलला गेला होता.

आता आम्हाला हसू आवरत नव्हते. सुदैवाने त्याला कसलीही दुखापत झालेली नव्हती. पण अजून फवारा उडून आम्हा सगळ्यांनाच अंतराळ यात्रा घडण्यापूर्वीच तेथून दूर पळालो.

जगूजी मात्र ह्या प्रकाराच खरोखरीच विचार करीत होता. हे असं घडतं तरी कसं?

आणि त्याचे कारणही आमच्या लक्षात आहे. तिकडे समुद्रात एखादी मोठी लाट फुटली की तिच्या मागोमागच ते पाणलोट भोकातून वर उसळत होते. नाही तर नाही. मग आपोआपच सगळा उलगडा होत गेला. आम्ही ज्या खडकावर उभे होतो, तो खडक खालून पोकळ होता. त्या पोकळीत लाटेचे पाणी सोसाट्याने आत घुसले की, त्याला बाहेर पडायला दुसरी वाट न मिळाल्यानं त्या भोकातून ते असं फवाऱ्यासारखं सपाट्यानं ते उंच उसळत असं वर उडत असणार. याशिवाय दुसरं कारण काय असणार?

"राघोजी, - ते पाण्यात काय आहे रे? पुन्हा देवमासा तर नव्हे?" आम्ही तेथून निघण्याच्या बेतात असतानाच जगूजी म्हणाला.

एका खडकाच्या कंगोऱ्यावरून तो खाली डोकावून पाहात होता. मीही

लगेच तिकडे धावलो. एक फिकट हिरवट रंगाचा कसलातरी पदार्थ तेथे हालत होता.

"नाही... देवमासा नसणार हा... दुसरंच काहीतरी असावं..."

"पिराजी, इकडं ये... तुझा भाला बघू... मिळाली तर शिकार साधू या."

पण कितीही प्रयत्न केला तरी तो भाला काही त्याच्यापर्यंत पोहचत नव्हता.

जगूजीनं पुन्हा एकदा नीट नेम धरला. परंतु तोही नेम चकलाच. पाण्यातून नुसताच दांडावर आला. तो हिरवा मासा आपला होता त्या जागीच मजेत शेपटी हालवीत होता. दोन चार वेळा प्रयत्न केला तरी तो काही हाती लागला नाहीच, अन् तेथून तो निघूनही गेला नाही. मग आम्ही त्याचा नाद सोडून दिला. 'पुन्हा कधीतरी' असे म्हणत आम्ही तेथून निघालो.

• • •

# नऊ

शरीर आणि मन दोघांनाही विश्रांतीची आवश्यकता असते. मनुष्य प्राण्याच्या सभोवतालची परिस्थिती आणि भिन्नभिन्न मनोवृत्ती यामुळे विश्रांतीची जात किंवा कालमर्यादा बदलेल. मानसिक श्रम करणाऱ्यांना शारीरिक श्रम हीच विश्रांती ठरते. शारीरिक कष्ट करणारांना गाढ झोपेची विश्रांती आवश्यक असते. दु:खी-कष्टी भागलेल्या जीवांना आनंद आणि शांती ही विश्रांती देतात आणि मला तर असंही वाटतं की, सदा आनंदात, निष्काळजीपणांत किंवा क्षणभंगूर चैनीत डुंबत असणाऱ्यांना दु:खाचे क्षण हेही एकाअर्थी विश्रांतीसारखेच असतात. अशा विश्रांतीमुळे आनंदाची लज्जत वाढतच जात असते आणि ज्यांना विश्रांतीच नाही अशी एकच जमात आहे– दुष्ट लोक. दुष्टांना शारीरिक आणि मानसिक विश्रांती नाही.

आम्ही परत आलो त्यावेळी आम्हाला विश्रांतीची खरोखरीच नितांत आवश्यकता होती. शरीर आणि मन दोन्हीही कमालीचे थकून गेलेले होते. आश्चर्यकारक दिसणाऱ्या आणि दिसलेल्या गोष्टींमुळे मनावरही कमालीचा

ताण पडला होता. आडवे होताच जी झोप लागली, ती दुसरे दिवशी पार सूर्यास्त होईपर्यंत. सूर्यास्ताला जाग आली, उठलो... थोडेसे खाल्ले आणि पुन्हा जे आडवे झालो ते रात्र संपून दुसऱ्या दिवशीच्या तिसऱ्या प्रहरीच.

एवढ्या दीर्घ विश्रांतीनंतर मात्र आम्ही खरोखरीच अगदी ताजेतवाने झाळो. सगळा थकवा पार कुठल्याकुठे गेला होता. अशावेळी पाण्यात डुंबण्याची मजा अधिकच. गेले दोन-तीन दिवस आम्ही आंघोळीचे नाव घेतलेले नव्हते. आज मात्र भरपूर डुंबायचे असे ठरवून निघालो. आम्ही पाण्यात उड्या घेतल्या. काहीवेळ डुबक्या... उभे-आडवे, एकमेकांच्या खोड्या करीत होतो. पण मग मात्र काहीतरी बिघडले असल्याची जाणीव होऊ लागली. त्या पाण्यातून बाहेर आलो आणि तळ्याकडे निघालो. पण त्यातले बहुतेक सारे प्राणी मेलेले आणि पाण्याला कुजट घाण येत असलेली पाहून मला विलक्षण वाईट वाटले. हे असं का बरं व्हावं ?

पिराजी जवळ येत म्हणाला, "काय रे ? कसला विचार करतोयस ?"

मी फक्त समोर हात केला.

"हे असं काधीतरी होणारच होतं. अगदी साधं कारण आहे... महासागरातले प्राणी या असल्या डबक्यात जगणारच तरी कसे ?"

त्याचे म्हणणे मला एकदम पटले. म्हणालो, "तू म्हणतोयस ते खरंय... "मी एकीकडे बोट केले. तळ्याच्या काठाजवळ पाण्याच्या सपाटीवर बरेचसे मीठ गोळा झालेले होते. याचाच अर्थ असा होता की तळ्यातल्या पाण्याची पातळी कमी झाली होती आणि जे पाणी होते त्या पाण्यात क्षाराचे प्रमाण वाढलेले होते. परिणामी मासे मेले.

इतक्यात पिराजी ओरडला, "बारीकराव इकडे ये... लवकर... तुझा खेकडा —बघ कसा चमत्कारीक वागतोय— असलं पूर्वी कधी पाहिलं न्हवतं... बघ अंगातलं खमीस काढतोय..."

आम्ही घाईघाईनं काठावरून आत डोकावून पाहिलं. खरोखरी आपण आपल्या अंगातलं खमीस काढून टाकावं, असली विलक्षण क्रिया तो खेकडा करीत होता. आम्ही बघतच राहिलो. त्याच्या पाठीचा भाग खालून फाटला आणि त्या फटीतून सारखा वळवळ करीत एक मासाचा गोळा बाहेर येत होता. हळूहळू त्याचा आकार मोठा मोठा होत होता. मग त्याला पाय फुटले. काही क्षणातच त्याचे पाय पुरते बाहेर आले. आणि बघता बघता पूर्वीसारख्याच संपूर्ण शरीरानं त्याने चालायला सुरुवात केली.

"ही जादू आपण पूर्वी कधी पाहिली नव्हती बुवा!" पिराजी म्हणाला.

आम्ही सगळेच या चमत्कारानं चकित झालो होतो. तो खेकडा पहिल्यापेक्षा जास्तच मोठा झाला होता. हे जेव्हा पाहिलं, तेव्हा आमचं आश्चर्य पराकोटीला पोहोचलं होतं. म्हणजे खेकड्यांची वाढही अशा तऱ्हेने होत असते तर! पहिलंच कवच वाढून न होता– पहिलं कवच टाकून देऊन होत असते.

मग मात्र आम्ही आमच्या वेगळ्याच उद्योगात गुंतून गेलो. फणसाच्या झाडाच्या फळ्यांची होडी तयार करण्यात जगू आणि पिराजी गुंतले होते. मी मात्र त्यांच्या हाताखाली म्हणून राहायचो.

"चला जगूजी!" – एके दिवशी भल्या सकाळीच पिराजी म्हणाला. "आपल्याला कंटाळा आला बुवा या असल्या रोजच्या ठोकाठोकीचा. तुझी होडी म्हणजे जगातलं एक आश्चर्य ठरणार असं वाटू लागलंय मला– आज विश्रांती... डुकराची नाहीतर रानबदकाची शिकार करू. आज काहीतरी वेगळं हवं-- "

जगूजी होडीकडे निघाला होता. पिराजीच्या बोलण्यानं थबकला. हातातली कुऱ्हाड खाली टाकत म्हणाला, "तुझी जर तशीच इच्छा असेल तर त्या पाणलोटच्या खडकावर जाऊया आपण... वेगळंच हवं तर पुनः एकदा त्या फवाऱ्याच्या बिळावर जाऊन उभा रहा. मागल्या वेळेपेक्षा अधिक उंच उडशील... तेवढंच वेगळं मिळेल!"

"तू माझी चेष्टा करतोयस!" पिराजी गंभीर होत म्हणाला. मग जगूजीही जरा गंभीर झाला. म्हणाला, "ठीक आहे... मला पटलं तुझं म्हणणं; काहीतरी वेगळं हवं -- खरंच -- काय करावं?"

"त्या खडकाखाली असलेल्या हिरव्या माशाचं गूढ कुठं आपल्याला अजून कळलंय? -" मी म्हणालो.

"पिराजी जागचा उठला. कमरबंदात आपलं सोटकं आवळीत म्हणाला, चला तर तिकडेच..."

जगूजीनं आपला तिरकमठा, पिराजीनं भाला आणि मी माझी गोफण घेतली. मोठ्या उत्साहानं आम्ही त्या खडकाशी आलो. खाली पाण्यात डोकावून पाहिले. अजूनही तो हिरवा पदार्थ आपली शेपटी हलवीत असलेला आम्हाला दिसला.

"मोठं चमत्कारिकच आहे!" जगूजी.

"नाय तर काय" मी.

"असलं दृश्य कधी जन्मात मी पाहिलं नव्हतं..." पिराजी, "आणि

जगूजी एक गोष्ट... गेल्या खेपी अगदी मूर्खासारखा तू भाला मारलास... ह्यावेळी मी करतो ते काम... बरोबर त्याच्या हृदयाचाच वेध घेतो किनई बघ... अर्थात् त्याला हृदय असलंच तर--"

"ठीक आहे... ह्या खेपी तू प्रयत्न कर."

पिराजीने लागलीच पवित्रा घेतला. डावा पाय पुढे, किंचित मागे झुकलेला; उजव्या हातात भाला पेलून धरला नि क्षणार्धात तो भाला एखाद्या बाणासारखा पाण्यात खुपसला. त्या वस्तूच्या अगदी मध्यावर जाऊन घुसला, पण दुसऱ्याच क्षणी जसा होता तसाच झपाट्यानं पुन्हा वर आला. ते शेपूट तसंच हलत होतं!

"हे प्रकरण काहीतरी भलतंच दिसतंय... याच्या नादी न लागणंच बरं!"

"मलाही आता तसंच वाटू लागलंय. हा दृष्टीभ्रम तर नसावा? हा कुठला प्राणीच नसावा मुळात. आता आपल्याला त्याच्याजवळ बुडी मारायला कसलीच हरकत नाही... होय ना?

"बरोबर... आणि जगूजीनं अंगातले कपडेही काढले. सगळ्यात माझे पोहणं एकदम भारी आहे... चला तुम्ही जरा बाजूला सरका बघू!... अन् त्यानं त्या पाण्यात सूर मारला. धबाकन् आवाज आला. पाण्याचा एकच लोट वर उसळला अन् क्षण दोन क्षण जगूजी दिसेनासाच झाला. मग पाणी शांत झाल्यावर, तो त्या हिरव्या प्राणी म्हणा, प्रकाश म्हणा– त्याखाली खोल जाताना स्पष्टपणे दिसू लागला. अन् मग एकदम त्या प्रकाशाखाली बुडून आम्हाला दिसेनासाच होऊन गेला! काही क्षण आम्ही थबकलो. वाटलं, श्वास घ्यायला आता वर येईल. आम्ही टक लावून तो ज्या ठिकाणी बुडाला, त्या जागेकडे पाहात राहिलो. पण तो वर यायची काहीच चिन्हे दिसेनात! आणि मग मात्र मनात भलभलत्या विचारांनी गोंधळ माजवायला सुरूवात केली. त्याची आमची मैत्री जुळल्यापासून तो कधीच ठराविक मर्यादेपलीकडे पाण्याखाली राहिलेला नव्हता.

"पिराजी ऽ ऽ पिराजी ऽ ऽ" मी पुरता घाबरून गेलो होतो. आवाजही थरथरत होता. "पिराजी काहीतरी घोटाळा झालाय... खूप वेळ झाला त्याला आत जाऊन!" पण पिराजीच्याही तोंडून काहीच शब्द फुटत नव्हता. भयाने त्याचा चेहरा पांढरा फटक पडला होता. डोळे तर, – असं वाटत होतं, कोणत्याही क्षणी बाहेर पडतील. मग तो एकदम ताडकन उठून उभा राहिला. नि काही न सुचून हाताच्या मुठी वळून इकडे तिकडे सैरावैरा धावू लागला. "जगूजी...जगूजी.

किती मी मूर्ख... माझ्याचमुळे हे सगळं घडलं.. त्या प्राण्यानं त्याला गिळलं तर नसेल ?- ''

पुढचा काही वेळ... पाव अर्धा घटका आम्ही काय करीत होतो ते माझं मलाच स्मरत नाहीये. माझी तर शुद्धच हरपण्याच्या बेतात आली होती! पिराजीनं गदागदा हलवल्यानं मी भानावर् आलो.'' ''राघोजी! राघोजी! कदाचित त्याची शुद्ध हरपली असेल, तू पट्टीचा पोहणारा आहेस तू मार बुडी नि आण त्याला वर!

खरं तर हे माझ्या आधीच लक्षात यायला हवं होतं. मी मागचा पुढचा कसलाही विचार न करता कपड्यांसकट मी पाण्यात झेप घेतली. पुढच्याच क्षणाला मला जाणवलं की त्या हिरव्या प्रकाशातून काहीतरी वर येतय. तो जगूजीच होता. मग बरोबरच आम्ही पाण्याबाहेर डोक काढलं. नेहमीप्रमाणं मानेला झटका देत त्याने केसातले पाणी झटकीत त्याने आरोळी दिली. आम्हाला पुन्हा आश्चर्य वाटलं. इतकावेळ पाण्याखाली राहून हा जसाच्या तसाच कसा काय? चांगला घटकाभर तो पाण्याखाली होता. मी काहीशा बावरल्या, घाबरल्या अवस्थेतच त्याला हात दिला. दोघेही पाण्याबाहेर आलो. पण मी जसा घाबरलेला होतो तसा पिराजी मात्र अजिबात दिसत नव्हता. पण जेव्हा जगूजी बाहेर खडकावर येऊन बसला. धापा टाकू लागला. त्यावेळी मात्र एकदम त्याच्या गळ्याला मिठी मारून स्फुंदून स्फुंदून रडायला सुरूवात केली. ''जगूजी, अरे होतास तरी कुठं इतका वेळ? काही संकटात तर सापडला नव्हतास ना?''

जगूजी फक्त हसला, आणि आपली हकीकत सांगू लागला. ''मित्रांनो... तो हिरवा पदार्थ म्हणजे कोणताही मासा - प्राणी नाही... खडकाच्या गुहेतून येणारा तो एक प्रकाशझोत आहे. हे मी पांहिलं अन मग त्या दिशेनंच निघालो. आतून प्रकाश येत असल्यामुळे आतली वाट चांगलीच स्पष्ट दिसत होती. क्षणभर विचार करून धाडस करायचंच असा निर्णय घेतला. हे सांगायला जेवढा वेळ लागतोय त्यापेक्षा कितीतरी कमी वेळात ते सगळं घडून आलं होतं. कदाचित् दम टिकणार नाही असंही वाटत होतं... पण त्या गुहेत मला काहीतरी चमत्कारीक वाटलं, म्हणून परत फिरण्याचा विचारच बाजूस सारला. कुठूनतरी उजेड येत होता. मी अजून पुढे गेलो, तर पायाला तळ लागला. मी पाय टेकून उभा राहिलो. तर पाणी माझ्या छातीपर्यंतच!

मी सभोवार दृष्टी टाकाली. काळोखाला नजर सरावलेली नसल्यामुळे अगोदर

काहीच दिसत नव्हतं. पण जराशाने डोळे सरावल्यावर लक्षात आलं की, एक भव्य विशाल अशा एका गुहेच्या मध्यभागी मी उभा होतो. वरचं छतही अगदी स्पष्ट दिसत होतं, आणि ते आभाळात रात्री जसे तारे चमकतात त्याप्रमाणे चमकत होतं. ती गुहा खूप लांब खोल असावी. पण पुढं काळोख असल्यामुळे काहीच दिसत नव्हतं. ते बघताना मी भान हरपूनच गेलो होतो. अजून पुढं जायची इच्छा होती पण इकडे तुम्ही काळजीत असाल म्हणून परतलो... पण ... आपण परत जायचं-"

ती हकिकत ऐकल्यापासून माझ्याच्यानं स्वस्थ बसवेचना. हात पाय उत्साहाने फुरफुरू लागले होते. इतक्यात पिराजी म्हणाला, "मलाही न्याल ?"

"नेऊ की ! पण तत्पूर्वी आम्ही पुन्हा एकदा निरीक्षण करून येतो."

आपण आपल्याबरोबर चूड घेऊन जाऊ. आत उजेड करता येईल.

"वा ! अगदी मनातलं बोललास तू !"

आम्ही लागलीच कामाला लागलो.

चटकन् पेट घेऊ शकेल अशी एका झाडाची साल शोधून काढली. घट्ट अशी चूड तयार केली. शिवाय ती भिजू नये म्हणून व अधिक वेळ जळत राहावी ह्या उद्देशाने अजून दुसऱ्या एका झाडाचा चीक चोपडला. अधिक संरक्षण व्हावं म्हणून मग त्यावर नारळीचं कापड गुंडाळलं. खूप फेरे घातले. मग एका तेलकट पानाच्या गुंडाळीत थोडसं पेटवण घेतलं. वाळलेल गवत- काटक्या-धनुकलीचं केलेलं गिरमिट घेऊन हे सर्व त्या वल्कली कापडात गुंडाळून घेतलं.

"पिराजी, आम्हाला थोडाफार उशीर लागला तरी चिंता करू नकोस ! काय ?-"

आम्ही पाण्यात उड्या घेतल्या. जगूजीच्या पाठोपाठ मी निघालो.

विनासायास त्या खडकाच्या गुहेत जाऊन पोहोचलो. हातातली गुंडाळी झटकन वर काढून काही वेळ डोळ्यांना अंधाराचा सराव होईपर्यंत तसेच उभे राहिलो. मग अधिक पुढे जाऊन चूड पेटवली. चूड पेटवून त्या प्रकाशात आमच्या नजरेस जे दृश्य पडलं ते पाहून आम्ही आवाक्‌च होऊन गेलो ! छत सरासरी तीन वार उंचीवर होतं आणि ते केवळ निव्वळ किंमती अशा रत्न-माणकांचंच बनलेलं होतं. त्या छताला आधारासाठी म्हणून निर्सगत: तयार झालेले चुनखडीचे खांब उभे होते. वरच्या छतावर एखाद्या पुरातन लेण्यात असावं असं काही खोदकाम असल्याचा भास होत होता. बाजूच्या भिंतीही जणू हिऱ्याच्याच बनलेल्या

होत्या. त्यांचे तेज चोहोंबाजूस फाकत होते. कुठल्यातरी अज्ञात भोकातून आत येणारा प्रकाश परावर्तित होऊन तो बाहेर दिसणारा हिरवा मासा तयार झाला होता!

खाली उतरून बराच वेळ झाला होता. माघारी निघायला हवं होतं. हातातली चूड काळजीपूर्वक विझवली आणि तेथल्या एका कोरड्या कोनाड्यात काळजीपूर्वक ठेवली. चूड विझली तशी ती जादू संपली. चमचमणारे हिरे माणके लुप्त झाले होते. सगळीकडे पुन्हा गार अंधार पसरला. आम्ही माघारी वळलो. पिराजी आमची वाटच पाहात बसला होता. आम्हाला पाहताच त्याच्या चेहऱ्यावर एकदम आनंदाच्या लाटा उमटल्या.

त्या रत्नगुंफेत आम्ही चांगल्या दीड-दोन घटका काढल्या होत्या. परतीच्या प्रवासात पिराजीला शक्य तेवढे सविस्तर हकिकत-वर्णन ऐकवले. पण त्या गोष्टीकडे त्याचे फारसे लक्षच नसावे. कारण अचानक त्याच्या तोंडून 'ट्यॅक-' हा आवाज बाहेर आला. पाठोपाठ तो म्हणाला, "ऐका ऐका... कसला आवाज येतो तो..."

आम्ही कान टवकारले.

डोंगरावरून बहुतेक डुकरं खाली उतरत होती. पिराजी म्हणाला, "आज मात्र या सावजाला माझ्या हातून सुटता येणार नाही -"

• • •

## दहा

"पिराजी..., जरा दम धर..., घाई गडबडीनं घोटाळा मात्र करून ठेवशील-" जगूजी पुढं म्हणाला, "असं करा, तू आणि हा बारीकराव त्या खडकाशी थांबा – मी वर जातो हाकारा घालायला... चांगला, दांडगा डुक्कर बघूनच भाला सोड-" आणि आम्ही काही बोलायच्या आतच जगूजी त्या जंगलात अदृश्यही झाला.

"खरं म्हणजे... ह्या असल्या मुक्या प्राण्यांबद्दल मला मनापासून प्रेम वाटतं बघ..."

मला हसू आले.

"सावधान ... सावधान..." जगूजीच्या भीषण आरोळीनं मी दचकलो. आमच्या रोखानं डुकरांचा कळपच्या कळप दौडत येत होता. "पिराजी ऽऽ सावधान... !" पिराजी एकदम सरसावला. डुकरं एवढ्या वेगानं येत होती की त्यातली दोन डुकरं, त्या डोंगर उतारावर तोल न सावरू शकल्यानं सरळ गडगडतच खाली गेली. एक तर उलटंपालटं फेकलं गेलं. पण पुन्हा पायावर उभं राहिलं अन् पळू लागलं. इतक्यात मी माझी गोफण सरसावली. गोफणगुंडा आणि पिराजीचा भाला

दोन्ही एकदमच त्या डुकरावर आदळले... डुक्कर भुईसपाट!

"शाब्बास - बारीकराव!" पिराजी ओरडला. मी चकित झालो. पण बरंही वाटलं. विजेच्या वेगाने पिराजी पुढे धावला. त्या डुकराच्या छाताडातला भाला उपसला आणि पुन्हा पवित्रा घेतला... आणि मागून येणारा एक म्हातारा डुक्कर हेरला. दात ओठ खात भाला जो त्याच्या छाताडात हाणला की पलीकडूनच बाहेर आला!

"हे रे काय पिराजी?" जगुजीनं विचारलं... एक मारला होतास ना?,

"बरं मग?"

"अरे त्या एका डुकरात आपलं पोट भरणार नाही असं वाटलं की काय तुला?"

"अंहू! पोटासाठी नाही मारला मी याला... पायासाठी... माझ्या पायातले जोडे फाटायला आलेत... नवा जोड नको का बनवायला?..."

"अच्छा अच्छा...!"

आता आमच्यासमोर प्रश्न होता की ही अवजड धुडं आपल्या घरापर्यंत न्यायची कशी?

अखेरीस चारी तंगड्या एकत्र बांधल्या अन् त्यामधून भाला आडवा घालून घेतले खांद्यावर आणि निघालो.

पोट तट्ट झाल्यामुळे रात्री अशी झोप लागली की वा!

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २८६०. दिनांक ९८/१०/९३
विषय बा.वा. क्र. ........

# अकरा

मग मात्र आम्ही या असल्या उद्योगांना कटाक्षाने दूर सारले आणि जगूजी तयार करीत असलेल्या होडीच्या पाठीमागे लागलो. बऱ्याच कष्टानंतर तो ओंडका पुष्कळसा होडीसारखा दिसू लागला. पण जो कोणी एक कुऱ्हाड, एक मोडका चाकू, एक लहान सुई नि एक लोखंडाचा बारका तुकडा एवढ्या साधनानिशी होडी बनवेल त्यालाच आमच्या कष्टाची खरी कल्पना येऊ शकेल. जगूजीची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि अपार जिद्द... हेही तेवढेच महत्त्वाचे होते म्हणा!

या संपूर्ण कामात मी आणि पिराजी फक्त हरकामे म्हणूनच सहभागी होत होतो. जेव्हा आम्हाला करण्यासारखे काही काम नसे, त्यावेळी मग आम्ही आमचा वेळ शिकारीसारख्या कामात सत्कारणी लावत असू. शिकारीमुळे संध्याकाळच्या जेवणाचा मुखडाच बदलून गेला होता.

एके दिवशी मी आणि पिराजी... भोजनाचा सगळा सरंजाम मांडून बसलो असतानाच, जगूजी आला. हातातली कुऱ्हाड बाजूला टाकत म्हणाला, "मित्रांनो आपली

होडी तयार झाली! फक्त आता दोन वल्ह्यांचीच काय ती कमतरता आहे. तेवढी तयार झाली की मग आपण मनात आणू तेव्हा सफरीवर निघू शकू."

"जगूजी... तू म्हणजे खरोखरीच एक चमत्कार आहेस, पण तुझ्या या कामात आम्ही काही फारशी मदत करू शकलो नाही म्हणून खरोखरीच फार वाईट वाटतेय... पण मग जर होडी तयारच झाली असेल तर... उद्याच एक समुद्रात चक्कर मारून यायला काय हरकत आहे?" पिराजी म्हणाला.

"हं हं! वल्ही पूर्ण झाल्याखेरीज होडी पाण्यात ढकलायची नाही. आज किंवा उद्या संध्याकाळपर्यंत वल्ही तयार होतील जास्तीत जास्त उद्याची रात्र!

मग आपण नारळाच्या कापडाची शिडं तयार करू आणि एक डोल काठीही उभारू होडीत. आजूबाजूच्या बेटावर जाता येईल..बघू यात अजून कोणी दोस्त वगैरे भेटताहेत का?

आम्ही सगळेच उत्साहानं कामाला लागलो. जेवण वगैरे घाईघाईत उरकले आणि वल्ह्यांच्या कामाला लागलो. जगूजी ती वल्ही अडकवण्यासाठी दोऱ्या वळायच्या कामाला लागला. दिवस मावळायला चार वल्ही तयार झाली होती! पूर्ण झालेल्या होडीकडे आम्ही एक नजर टाकली आणि आनंदाने एकमेकांच्या गळ्याला मिठ्या मारल्या.

जेवण वगैरे झाल्यावर आकाशात बघत पडल्यापडल्या आम्ही आमच्या होडीची आणि दर्यावरील सफरीची स्वप्ने रंगवू लागलो.

अद्याप आम्हाला डोलकाठी आणि शिडं बनवायची होती. त्यासाठी किमान दोन दिवस तरी लागणार होते.

सकाळ झाली तसा आम्हाला धीर धरवेना. आम्ही सरळ ती होडी पाण्यात लोटली. वर आकाश निरभ्र होतं. चहूकडे सूर्यप्रकाश मोठा स्वच्छ सुंदर पसरला होता. मंदमंद वाहणाऱ्या वायुलहरींमुळे समुद्रावर चिमुकल्या लाटा हेलावत होत्या. समुद्र पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत होता. सूर्याच्या प्रकाशांत अजूनही डोंगरमाथे लालसर दिसत होते.

मी म्हटले, "अगोदर आपण त्या रत्नगुंफे पलिकडच्या बंधाऱ्याकडे जाऊ -"

पिराजी म्हणाला, "छ्या त्यात काय ते मिळणार? त्याऐवजी आपण पलिकडच्या बेटांवर जाऊ, कदाचित् कांही तरी अजून नवे सापडेल."

"आपण दोन्हीकडे जाऊ, पण आत्ताच नको- आपल्या होडीला अद्याप शीड बांधलेलं नाहीये, अधिक खोल समुद्रात गेलो तर कदाचित नसती आफत

यायची-'' जगूजी म्हणाला.

"बरोबर आहे. अगोदर शिडं लावायला हवं. आता त्याच उद्योगाला लागायला हवं आपल्याला!" पिराजी मनापासून म्हणाला मग थोडा वेळ अशीच सफर करून डोक्यावर सूर्य येईपर्यंत आम्ही आमच्या 'घरा'कडे परत निघालो. भूकही बरीच लागली होती. होडी कोरड्या वाळूवर आम्ही ओढून आणून ठेवली. जगूजी म्हणाला, "चला...! पहिली सफर तरी निर्विघ्न पार पडली."

"होय कपितान!"

जेवण झालं आणि आम्ही लगेचच कामाला लागलो काटंजाच्या खडका-जवळच्या नारळाच्या झाडाचे 'कापड'चांगलेच लांब-रुंद असे बरेच कापड शिडं शिवण्यासाठी आम्ही जमिनीवर अंथरून ठेवले होते व सुईने वेलीच्या चिवट धाग्याने त्याची शिलाई सुरू होती. दुसऱ्या दिवशी आमचे 'समुद्र-गरूड'... अर्थात हे आम्हीच दिलेले नाव होते... असलेल्या बेटावर जाण्याचे बेत करीत होतो. इतक्यात दूरून क्षितिजाजवळून एक काळी रेषा हळूहळू पुढे सरकताना आम्हाला दिसली. आरंभी वाटलं की, असतील ते वादळी ढग... पण हळूहळू जसजशी ती रेषा पुढे पुढे सरकू लागली त्यावेळी काहीसा घनगंभीर ध्वनीही कानावर आदळू लागला. आमच्या बेटाकडे त्या रेषेचा प्रवास मोठ्या वेगाने चालला होता. ती जवळ येताच, आकाशात प्रचंड भिंत उभी राहिली! पाठोपाठ कर्कश ध्वनीही कानावर आदळला! ती एक प्रचंड लाट होती. आपल्या राक्षसी अवतारात ती बंधाऱ्याच्या लगत आली अन आम्हाला धडकी भरल्यासारखंच झालं. आम्ही ताडकन उठलो अन् त्या खडकाचं अत्युच्च शिखर गाठलं. पळता पळता किती पडलो, किती धडपडलो हेही बघायला सवड नव्हती.

ती लाट किनाऱ्याशी आली आणि सारा आसमंत घुमू लागला. धाडकन् आवाज करीत ती फुटली आणि चोहीकडे पाणीच पाणी होऊन गेले. ते बेट जवळजवळ सगळेच पाण्याखाली झाकले गेले. आता खरे संकट आमच्यापुढे उभे राहिले. पुढे कुठेही पळायला जागा नव्हती. काही क्षणातच त्या भोकातून अख्खा प्रस्तर उखडून आकाशात उडतोय की काय अशा वेगाने फवारे उडू लागले. भयानक कर्णकटू आवाज, आता भोकातून बाहेर येताना, किंचाळल्यासारखा वाटू लागला होता. त्या पाण्याच्या माऱ्यानं आम्ही भिजून चिंब तर झालो होतोच-पण काही क्षण आंधळेही होऊन गेलो होतो. काहीच कोठे मार्ग नव्हता, आम्ही होतो तसेच उभे राहिलो काही क्षणानंतर तो प्रलय थोडाफार ओसरू लागला

आणि आम्ही त्या बंधाऱ्याकडे पाहिले. ती लाट बंधाऱ्याशी फुटून तेथेच न थांबता पुढेही इतक्या वेगाने आदळली की, त्या वाळवंटाचा एकच घास करून मग त्याच्याही पुढच्या गर्दराईत फुसांडत घुसली होती आणि आपल्या आंधळ्या थैमानात छोटी झाडंझुडपं तिने पार जमीनदोस्त करून टाकली होती!

आम्हाला आमच्या 'घरा'चीही काहीच शाश्वती वाटत नव्हती. ते पार धुवून गेले असणार अशी खात्री झाली होती. आम्ही घराकडे जाण्यासाठी घाईघाईने पाय उचलू लागलो. पण म्हणावी तितकीशी आमच्या घराची दुर्दशा झालेली नव्हती. बरेसचे शाबूत होते. एक सुस्कारा सोडला आणि होडीची अवस्था बघण्यासाठी धावलो. पण... होडीची जागा रिकामी होती तिचा कुठेही मागमूस दिसत नव्हता. आम्ही मटकन् खालीच बसलो!

"ह्या लाटेच्या तडाख्यानं ती कुठतरी फेकली गेली असणार!" जगूजी म्हणाला.

ट्यॅक्... पिराजीनं अत्यानंदाने ट्यॅक्कार केला व म्हणाला, "दोस्त... जगातलं आश्चर्य आतापर्यंत नारळीला नारळच येत होते, आता दोन झाडात मिळून एक होडीही येऊ शकते ते बघ."

आम्ही त्याने दाखवलेल्या दिशेने नजर वळवली, आमची ती होडी त्या दोन झाडांच्या शेंड्यांनी वरच्यावर झेलून धरली होती आम्ही आनंदाने अक्षरश: आरडूओरडू लागलो, कारण त्या होडीइतके प्रिय असे दुसरे काहीच नव्हते.

आता पुढचा प्रश्न होता घराची साफसफाई आणि त्या झाडांवरून कुठलीही मोडतोड न होऊ देता ती होडी अलगद खाली उतरवणं....

ह्या सर्व कामात चार सहा दिवस गेले. मग पुन्हा समुद्र गरुडाच्या बेटावर जाण्याचे विचार मनात घोळू लागले. त्या दिशेने आमच्या हालचालीही सुरू झाल्या. एक-दोन दिवस पुरेल एवढा अन्न पुरवठा आम्ही आमच्या होडीवर करून ठेवला आणि मग एका सुरेख सकाळी आम्ही प्रस्थान ठेवले. वाराही बेताचा होता. बाहेरील संथ पाण्यावरून आम्ही मजेत जणू घरंगळत चालली होतो.

"वारा जरा अधिक जोराचा हवा होता!" जगूजी म्हणाला.

"हं...! फार हात दुखायला लागलेत! कपाळावरचा घाम टिपण्यासाठी त्याने वल्हे थांबवले.

"एखाद्या देव माशाच्या शेपटाला भोक पाडू या... त्या भोकाला आपली

होडी बांधू या... आपोआप पुढे जाऊ शकू!"

"पुढे कुठे? सरळ वर –"

सगळे हसलो.

"पिराजी, वारा सुटलाय! शिडं उभार. बारीकराव, सुकाणू सांभाळा मी डोलकाठी बघतो मात्र वावटळीकडे लक्ष ठेवा!"

आम्ही शिडं उभारली शिडांच्या पोटात वारा शिरला अन् एखाद्या पाखराप्रमाणे आमची होडी पळू लागली.

"ते पहा... ते पहा सैनिक पक्षी– सगळ्यांच्या तुमानी पांढऱ्या फेक. आपलं स्वागत कसं करतात कुणास ठाऊक!"

आम्ही अधिक पुढे आलो. जवळ येताच त्या चमत्कारीक प्राण्यांचं एकंदर रूप, नि हालचाली पाहून आम्हाला मोठी मौज वाटली. त्यांच्याही वेगवेगळ्या जाती दिसत होत्या. मधूनच ते थव्याथव्याने आकाशात झेपावत होते. जेव्हा तो थवा आमच्या डोक्यावरून जाऊ लागला त्यावेळी वाटले की जणू आमच्या डोक्यावर कोणीतरी आवाढव्य अशी पांढरी छत्री धरलीय.

कदाचित् त्यातील काही आमच्या चाहुलीनं घाबरले आणि त्यांनी पटापट पाण्यात उड्या घेतल्या अन् डुबकी घेऊन दुर कुठेतरी बाहेर पडू लागले.

दूरवर त्यांची वसाहत असावी. सुबक, आखीव रेखीव, सगळे कसे शिस्तबध्द होते; काही माद्या आपल्या पिलांना भरवीत होत्या, तर काही आपल्या पिलांना मुद्दाम पाण्यात ढकलून पोहायला शिकवत होत्या. पिलंही धडपडत होती, कलकलत होती. जी पिलं पाण्याला घाबरत होती, त्यांना त्यांच्या आया मुद्दाम पाण्यात ढकलीत होत्या.

हे सगळं पाहून जगूजी म्हणाला, "आपण इथंच थाबावं... घे किनाऱ्याकडे बघू!"

काही क्षणातच आम्ही खडकाजवळ होडी गुंतवली आणि हातात वल्ही अन् सोटके घेऊन किनाऱ्यावर पाऊल ठेवले. आमच्यावर हल्ला वगैरे करण्याऐवजी ते पक्षी नुसतेच आमच्याकडे पाहात राहिले! हे मात्र नवल होते.

मग कितीतरी वेळ आम्ही त्या प्राण्यांचे निरीक्षण करण्यातच वेळ घालवला. सूर्य पश्चिमेकडे झुकू लागल्यावर परतीच्या प्रवासाला लागलो!

• • •

# तेरा

एके दिवशी...

नेहमीप्रमाणे, आम्ही त्या आमच्या रत्नगुंफेतून फेरफटका मारीत होतो ; धण जरासे ऊन खावे म्हणून पिराजी मात्र एकटाच वर येऊन बसला होता. इतक्यात त्याच्या नजरेला काहीतरी वेगळेच पडले. पाण्याशी ओणावून त्यांने आम्हाला वर येण्यासाठी खुणा करायला सुरूवात केली. आम्ही वर आलो तसे तो क्षितीजाकडे बोट नाचवत ओरडू लागला, "जहाज- जहाज...."

आम्ही आनंदाने वेडें झालो. ते जहाज. जर ह्या आमच्या बेटाला लागलं असतं, तर आम्ही पुन्हा आमच्या मायदेशी जाऊ शकणार होतो.

दोन-तीन घटकातच ते जहाज आमच्या किनाऱ्याशी आलं आणि त्याने आपलं शीड गुंडाळायला सुरूवात केली. त्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आम्ही आरडाओरडा सुरू केला. हवेत आमचे रूमालही उंच उडवून फडकावले आणि त्या जहाजावर एक बावटा सरसरत वर चढू लागला. एक मानवी कवटी आणि दोन हाडके गुणाकाराच्या खुणेसारखी. आमची

तोंडे तशीच उघडी राहिली अन् इतक्यात धडाम् ऽ ऽ धूम ऽ आवाज करीत एक तोफगोळा आमच्या पिछाडीवरच्या नारळीच्या झाडीवर येऊन आदळला. सात आठ नारळीची झाडे उन्मळून पडली तिघांच्याही तोंडून एकदमच उच्चार बाहेर पडला... 'चाचे'!

"आता पुढे ?" जगूजी

"पळायचं!" पिराजी

"अन् रत्न गुंफेत लपायचं!"

आम्ही धूम ठोकली.

पण पाण्याशी येताच पिराजी अडखळला,

"मला नाही जमणार" पिराजी.

"जमेल सगळं जमेल-" मी.

"नको-तुम्ही जा-मी थांबतो."

"काहीतरी मूर्खासारख्या बोलू नकोस, एक तर तू आमच्या बरोबर येशील किंवा आपण सगळेच इथं थांबू!"

खाली हत्यारबंद डाकूंची होडी किनाऱ्याला लागत होती.

"आता त्यांनी आपल्याला पाहिल्यं. आपल्याला शोधल्याशिवाय गप्प बसणार नाहीत. चला पळा!"

आणि तिघांनीही एकदमच पाण्यात उड्या घेतल्या. पिराजीचं धैर्य खरोखरी कौतुक करण्याजोगं होतं. आम्ही गुंफेत शिरलो. "काही दिवस तरी आपल्याला इथं मुक्काम करावा लागणार आहे. कारण हे बदमाश फार काळ जमिनीवर राहात नसतात. त्यांच घर म्हणजे समुद्र! एक दोन दिवसात जातील निघून आपल्या मार्गानं!"

मध्यंतरीच्या काळात आम्ही त्या रत्नगुंफेत खूप शोध लावले होते. पाण्यापासून पूर्ण सुरक्षित कोरड्या अशा काही कपारी आम्ही हेरून ठेवल्या होत्या. वेळप्रसंगी उपयोगी पडतील म्हणून नारळ, भाकर, फळे, चूलगुल पेटवण, नारळ, कापड इ. गोष्टींचा संग्रह करून ठेवलेला होता आणि आज नेमके ते सगळे उपयोगी पडत होते.

भोकातून येणारा उजेड दिसेनासा झाल्यावर आम्ही समजलो की, आता

रात्र झाली आम्ही चूल विझवली आणि झोपून गेलो.

दुसरे दिवशी सकाळीच जाग आली क्षणभर आपण कुठे आहोत हेच लक्षात आले नाही. काही क्षण असेच गेले. पाण्याच्या चुबूक चुबूक आवाजाने आम्हाला पुन्हा भान आले.

कदाचित ते डाकू निघूनही गेले असतील परंतु वरती जाऊन आल्याशिवाय काही कळायला मार्ग नव्हता. शेवटी मीच म्हणालो. "तुम्ही थांबा इथंच. मी जाऊन येतो."

"पण फार उशीर लावू नकोस!"

"माझी काळजी नका करू!"

"सावध राहा!"

"मी चाललो -" आणि मी वर आलो. काही क्षण थांबलो. मोकळा श्वास घेतला, हळूहळू बाहेर येऊन सभोवार पाहू लागलो.

किनारा स्पष्ट दिसत होता आणि तो रिकामा होता. कोणीही तेथे दिसत नव्हते. त्यांची होडी दिसत नव्हती. कदाचित् जवळपास त्याच्यांपैकी कोणी लपलेले असण्याचीही शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे मी पुढे जाण्याचे धाडस मात्र केले नाही. त्यांचे गलबत दूरवर जाताना दिसत होते. मी समाधानाने एक सुस्कारा सोडला!

आणि स्व:तशीच बडबडलो- "हां! शेवटी गेले बदमाश! बरोबर गुंगारा दिलाच शेवटी त्यांना!"

"नाही! तरुणा, तू चुकलास!"

अचानक माझ्या पाठीमागून आवाज आला आणि मी हादरलो; कोणीतरी पोलादी पकडीत माझी मानगूट पकडली होती!

तो एक भला धिप्पाड नि उग्र चेहरेपट्टी असलेला काळा, दाढी वाढवलेला असा माणूस होता. डोक्याला घट्ट परदेशी टोपी अन् कमरेभोवती भारीपैकी तलम रेशमी रुमाल गुंडाळलेला, नि त्यात एक-दोन छोट्या बंदुका, एक लांबच्या लांब तलवार खोचलेली.

"काय रे? तुझे नावं... देश कोणता?... आमच्यासारख्यांना गुंगारा देणं इतकं सोपं वाटलं होय?" त्याच्या चेहऱ्यावर एक क्रूर हास्य होते. त्याने आपल्या तोंडात दोन बोटे खुपसली आणि एखाद्या पक्ष्याप्रमाणे पलीकडूनही तसाच आवाज आला.

त्या लोकांची दूरवर दिसणारी होडी माघारी वळली.

"मुकाटयाने मी सांगेन ते ऐकायचे. पळून जायचा प्रयत्न केलास तर याद राख... तलवारीची धार फारच तेज आहे." आपल्या तलवारीला कुरवाळीत तो म्हणाला.

त्याने बहुधा खुणेसाठी थोडेसे वाळके गवत पेटवले. त्याचा धूर आभाळात चढू लागला आणि त्यानंतर पुन्हा एकदा तोफेचा धडामधूमऽऽ असा आवाज झाला.

त्यांनी आम्हाला बनवले होते. निघून गेल्याचा आभास छान निर्माण केला होता. त्यांच्या तावडीत मी आता पुरता अडकलो होतो.

"अजून ते दोघे कुठंयत कपितान ?"

मला ज्याने पकडले होते त्याला कुणीतरी विचारीत होते.

"ऐकलेस नां ? कुठंयत तुझे सोबती ?"

"मी मुळीच सांगणार नाही !"

कपितानने चमकून माझ्याकडे पाहिले, अन् हसला. म्हणाला, "मरू देत ह्याला. अगोदर उचलून फेका आपल्या होडीत."

त्यांच्यापैकी दोघांनी खरोखरीच मला वर उचलून घेतले. होडीपाशी येताच निर्जीव वस्तूप्रमाणे होडीत भिरकावून दिले आणि माझी शुध्द गेली.

● ● ●

# चौदा

मी शुध्दीवर आलो त्यावेळी आजूबाजूला स्वच्छ सूर्यप्रकाश पसरला होता आणि त्या गलबताची लाकडी जमीनदेखील कमालीची स्वच्छ होती. सगळीकडे कसा अगदी व्यवस्थितपणा होता. इतके खलाशी होते, पण कुठे गडबड होत नव्हती. पण.. सारेजण हत्यारबंदही होते. त्यापुढे किती इच्छा असून पळून जाण्याचा प्रयत्न करणे, मूर्खपणाचे ठरले असते. मला माझ्या मित्रांची आठवण आली आणि घशाशी एक हुंदका दाटून आला. कठड्यापलीकडचे सगळे मला स्पष्ट दिसत होते. आम्ही ज्या बेटावर होतो, त्या बेटाचा कुठं मागमूसही आता दिसत नव्हता. आता पुन्हा माझ्या मित्रांची भेट जवळजवळ अशक्यच होती.

सुरुवातीला माझ्याशी कोणीच काही बोलत नसे. फक्त वेळ झाली की, माझ्यापुढ्यात जेवणाची थाळी येत असे, तीही एक वयस्कर खलाशीच आणत असे. मला कुठेही जहाजावर फिरण्याची मुभा होती पण मी पळून वगैरे जाऊ नये म्हणून कोणाची ना कोणाची तरी माझ्यावर कडक नजर असे.

अधूनमधून त्या गलबताचा कपितान जहाजावर चक्कर टाकत असे, त्यावेळी मी समोर दिसलो, की माझ्याशी बोलायचा. गप्पा मारायचा. कधी लहर लागली की मला त्याच्या खोलीत बोलावून घ्यायचा. हळूहळू त्याने माझ्याकडून सगळी माहिती काढून घेतली. आम्ही तिघा मित्रांनी केलेले साहस ऐकून तर तो बेहद्द खूष होऊन गेला होता. म्हणाला, "खरा बहादूर बेटा आहेस!" तेव्हापासून सगळे लोक माझ्याशी तसे मोकळेपणाने वागत. कैद्यासारखी वागणूक कधी मिळत नव्हती.

माझी आणि मला जेवण आणून देणारा तो म्हातारा खलाशी... मी त्याला 'सरदार' म्हणत असे... आमची फार दोस्ती जुळली होती. तो मला त्याच्या मुलासारखे मानायचा. पण प्रत्यक्षात त्याला कोणीच नातेवाईक नव्हते. कोणी मुलगा नव्हता. अगदी एकटा होता. त्याची माझ्यावर मनापासून माया होती. सवड मिळेल तेव्हा आम्ही गप्पा मारीत असू. तो मला त्याच्या गतआयुष्यातल्या आठवणी सांगत असे, आलेली संकटे... त्यांचे निवारण, खूप काही काही सांगत असे. मजा यायची वेळही बरा जायचा. पण एंकदरीत दिवस बरे जात होते. फक्त दु:ख ऐवढेच होते की, माझे प्रिय मित्र दुरावले होते.

काही आठवडयांचा प्रवास झाला अन् एके दिवशी आम्हाला क्षितीजावर नारळीची झाडे दिसली. गलबतावर एकच गडबड गोंधळ सुरू झाला. डोलकाठीवर हातात दुर्बिण घेऊन बसलेला खलाशी 'जमीन जमीन' म्हणून ओरडत सुटला होता. आमचे गलबत त्या बेटावर खूपदा गेले होते म्हणे. ह्या बेटाचे नाव 'एमा' असे होते. हे बेट चंदनासाठी आणि हस्तीदंतासाठी प्रसिध्द होते. ह्या बेटावर खूप वस्ती असल्यामुळे इथं दांडगेपणा करून चालत नव्हतं. थोडं नरमाईनं वागावं लागायचं आणि त्यांच्याकडून जो माल घेत असतो त्याची किंमतही रोकडा मोजावी लागायची. थोडक्यात काय, तर हे चाचे ह्या इथल्या रानटी लोकांना वचकून होते.

हवेत बंदुकीची फैर झाडून कपितानाने आपल्या आगमनाची वर्दी त्यांना दिली. तिकडूनही हवेत रंगीबेरंगी निशाण असलेले बाण उडवले गेली. दोघांनी एकमेकांची दखल घेतली.

मग कपितानाने एक होडी पाण्यात सोडली. पाच दहा खलाशी गलबतावर ठेवले त्यातल्या एकाला तोफेशी सज्ज रहायला सांगितले होते. वेळप्रसंग आला तर लगेच तोफ डागायची: मग माझ्यासह पंधरा-वीस जण त्या होडीतून किनाऱ्याकडे

निघालो. प्रत्येक जण हत्यारबंद होते.

थोडया वेळातच आम्ही किनाऱ्याशी आलो – किनाऱ्यावर आमच्या स्वागतासाठी त्या बेटाचा प्रमुख – रोमाटा – उपस्थित होता. आपल्या छातीवर दोन गुद्दे मारून घेतले. मग मला कळले की, हा त्यांचा नमस्कार होता. आपल्याकडे हात जोडून करतात तसा. मग आमच्या कपितानाने आमचा येण्याचा उद्देश सांगितला. बरोबरच्या संदूकीतून आणलेले काही मौल्यवान हिरे-मोती त्यांना दाखवले आणि विशेष म्हणजे लाकडी पेटीत भरून आणलेली तंबाखूची पाने – ते सर्व पाहिल्यावर रोमाटाच्या चेहऱ्यावर खुषी पसरली व त्याने आम्हाला त्यांच्याबरोबर येण्याचे सुचविले.

रोमाटा आणि कपितान ह्यांच्यांत दिवसभर काही काही वाटाघाटी चालल्या होत्या. कधीकधी दोघांचे वाद एकदम विकोपाला जात. दोघेही संतापत, एकमेक तलवारींना हात घालीत पण पुन्हा कोणीतरी समेट घडवून आणे, बोलणी पुढे सुरू होत.

मला काहीच काम नसल्याने मी नुसताच भटकत होतो. एके ठिकाणी खूपच आरडाओरडा आणि गोंधळ चालू होता. मी दबकत दबकत पुढे झालो. दहा पंधरा माणसांना ओळीने एकेका खांबाला बांधलेले होते आणि भोवताली लाकडे रचली जात होती आणि हे काम करणारी माणसे आनंदाने नाचत गात होती; थोडीशी चौकशी केल्यावर कळले की... रोमाटाची त्यांच्यावरची मर्जी उडाली होती आणि आज रात्री विधीपूर्वक त्यांना जिवंत जाळण्यात येणार होते. त्यावेळी रोमाटाही आपल्या पाहुण्यांसमवेत तेथे येणार होता. रात्रीच्या मेजवानीचा बेतही तेथेच पार पडणार होता. हे ऐकून क्षणभर माझ्या काळजात हालल्यासारखेच झाले. समोर जिवंत माणसांना जाळले जाताना, आपण इथं मेजवानी झोडायची! सगळेच मोठे अवघड होते.

दुसऱ्या दिवशी चंदन तोडण्यासाठी आम्ही सगळे त्या बेटावर गेलो. कपितान आणि एक-दोघे मात्र गलबतावरच राहिले. तोफेचे तोंड फिरवून नि गोळा ठासून ते रोमाटाच्या घराच्या दिशेने रोखून ठेवले होते.

आमच्या जंगलासारखेच हेही जंगल होते. नारळ, रानकेळी, भाकरीची झाडं आणि अनेक अनोळखी झाडांनी ते बेट समृध्द होते. रताळीचे वेलही भरपूर होते. मधे एकेठिकाणी त्या लोकांची वस्ती लागली त्यांची घरे बहुधा बांबूचीच बांधलेली होती. त्यांच्या भिंती मातीने सारवलेल्या होत्या आणि त्यावर

कुठल्यातरी झाडाच्या पांढऱ्या चिकाने चित्रे काढलेली होती. चित्रे बहुतेककरून लहान-मोठे मासे, जंगली प्राणी ह्यांचीच होती; असेच अर्धा एक कोस पुढे गेल्यावर चंदनाचे जंगल लागले. आमची माणसे कामाला लागली. माझ्याकडे एकच काम होतें. तोडलेल्या झाडांची गणती करायची.

सूर्य माथ्यावर आला त्यावेळी रोमाटा आपल्या काही अनुयांयाबरोबर तेथे आलां. ते लोक आमच्यासाठी जेवण घेऊन आलेले होते. उकडलेली रताळी, भाजलेले डुक्कर आणि दुसरा एक पदार्थ– याला ते लोक याम म्हणत होते. रोमाटाही आमच्यासंगेच जेवायला बसला, पण गंमत अशी की, तो आपल्या हाताने खात नव्हता त्याची बायको त्याला घास भरवत होती!

"हा काय प्रकार ?"- शेजारीच बसलेल्या सरदाराला मी विचारलं.

"रोमाटा इथला राजा आहे! ह्या लोकांच्या चालीही मोठ्या विचित्र असतात. राजानं आपल्या हातानं कोणतही काम करायचं नसतं कपडेसुध्दा दुसऱ्याकडून चढवून घ्यायचे असतात."

'सगळीच गंमत– 'मला हसू येत होते. मी पुढे म्हणालो, 'पण असं दुसऱ्याच्या हातून जेवण भरवून घेऊन ह्यांच पोट कसं भरतं ?"

"त्यांचं त्यांनाच ठाऊक, अजून एक गंमत सांगतो ह्या राजाचा न्हावीही स्वतंत्र असतो. एकदा का त्याने राजाची हजामत आपल्या हाताने केली की, त्यालाही आपल्या हाताचा दुसऱ्या कामासाठी उपयोग करायला बंदी असते त्यालाही त्याची बायको असं जेवण भरवीत असते."

मनातल्या मनात मी कपाळावर हात मारून घेतला!

रात्री अंथरूणावर पडल्यावर मात्र मला माझ्या मित्रांची फार आठवण येऊ लागली होती. पळून जावे असा एक धाडसी विचारही मनात येत होता. पण पळून कुठे जाणार? गलबतात हे निर्दय लांडगे, खाली बेटावर ती हृदयशून्य नरमास भक्षक माणसं. शेवटी परमेश्वर करील ते खरे म्हणून झोपेची आराधना करू लागलो.

दुसरे दिवशी सकाळीच कपितानाने मला हाक मारली, अन् माझ्यावर एक कामगिरी सोपवली. खरे तर मला त्या बेटावर पाऊलही टाकण्याची इच्छा नव्हती. पण जाणे भाग होते. कपितान म्हणाला,

"हे बघ छोकऱ्या, तुला एक कामगिरी सांगणार आहे. तो बदमाष रोमाटा जरा नाखूष झाला आहे, त्याची नाराजी घालवण्यासाठी मी काही नजराणा देणार

आहे. आपल्याबरोबर कोणीतरी दुभाषा घेऊन जा तू... हा देवमाशाचा दात आणि हे आसामी गेंड्याचे शिंग त्याला सलामपूर्वक दे!''

आम्ही गेलो त्यावेळी रोमाटा आपल्या आसनावर बसलेला होता. आपल्या लोकांशी काहीतरी त्यांचे खलबत सुरू असावे, कारण आम्ही जाताच ते सगळे गप्प झाले. त्याने थोड्या घुश्श्यातच आमचे स्वागत केले. पण मी आणि सरदाराने आमचा नजराणा पुढ्यात ठेवताच; त्याचा चेहरा खुलला. पण त्या नजराण्याचा स्वीकार करताना मात्र, आव त्याने तटस्थपणाचा आणला होता.

''हुं! ठीक आहे. जा, तुमच्या म्होरक्याला जाऊन सांगा, आज तोडा लाकडं, पण उद्या नाही आणि इथं या म्हणावं रात्री; मला त्यांच्याशी बोलायचंय.''

त्याने आम्हाला निरोप दिला त्याच्या झोपडीतून बाहेर पडतापडता मी सहज मागे वळून पाहिले, रोमाटा आपल्या सहकाऱ्यांना कांहीतरी संकेत करीत होता.

तिथून आम्ही जंगलाकडे निघालो. सरदार म्हणाला, ''काहीतरी कारस्थान शिजतं आहे. या बदमाषांच्या डोक्यात हा सैतान माणूस आहे''

''हं-- कपितानाला सावध करायला हवं-''

आणि मग आम्ही इकडे तिकडे न रेंगाळता सरळ आमच्या गलबताकडे निघालो. रस्ताभर सरदार त्याच्या आयुष्यातल्या अनेक गमतीजमती सांगत होता.

आम्ही गलबतावर पोहोचलो. तडक कपितानाच्या खोलीकडे गेलो. कपितान आणि मेट नावाचा त्याचा उजवा हात, ह्यांचे बोलणे सुरू होते. मी जाऊन उभा राहिलो.

''ये - काय झाले? घेतला नजराणा?''

''होय.. एक निरोप आहे तुम्हाला''

''कोणता?''

मी त्याला रोमाटाचा निरोप दिला आणि चाचरत माझ्या मनातली शंकाही बोलून दाखवली.

''शाब्बास रे बहाद्दरा तू खरा आमचा झालास... छान -''

''कपितान- आपला माल तर चढलाच आहे नां गलबतावर? मग सरळ नांगर उचलू आणि चालू लागू- बसू दे त्यांना तसंच बोंबलत-''

''मूर्ख तर नाहीस ना तू? अरे अजून एक चतुर्थांश माल जंगलातच पडलाय, नि तो बदमाश त्याला हात लावू द्यायला तयार नाही... काय वाटेल ते करा म्हणाला-''

" अस्सं ? आम्हाला ही दमदाटी ? —— दुबळं झुरळ ते - "

' हो-- पण त्याच्यावरही हल्ला करायची तुझी छाती होत नाहीए—— "

" कोण म्हणतो , नाही म्हणून ? "

" मग ऐक , आज रात्रीच , वल्ह्यांचा आवाज बंद करून खाडीच्या तोंडाशी जायचं. तेथून ती जागा नेमकी तोफेच्या माऱ्यात येते , दोघांना- फक्त ' ह्या बहादूर बच्च्याला अन् , त्या त्याच्या सरदाराला ह्या गलबतावर पहाऱ्यासाठी ठेवायचं. आज आमंत्रणही आहे , जोरदार हल्ला करू. पाच पन्नास तरी मरतील - उरलेले पळतील - आपला माल उचलू अन् सूं ! "

मी मनात म्हणालो , कदाचित तिकडेही त्या लोकांचेही असेच काही मनसुबे चालू असतील.

कोळोख पडताच सारे लोक गलबताच्या कठड्याशी एकत्र जमा झाले. गलबतावरील सगळे दिवे मशाली विझवून टाकलेल्या असल्यामुळे मिट्ट काळोख पसरला होता. एकेक करीत सगळेजण दोन-तीन होड्यातून किनाऱ्याकडे निघाले.

मी आणि सरदार तेवढेच फक्त गलबतावर उरलो होतो आणि एकएकी माझ्या मनात विचार आला की , पळून जायला याच्याइतकी दुसरी नामी संधी कधीच मिळणार नाही !

थोडासा धीर करून मी माझ्या मनातला विचार सरदाराला ऐकवला तो मनापासून हसला , माझा हात हातात घेत दाबला अन् म्हणाला , " अगदी मनातलं बोललास ! "

...आणि मग आम्ही झटपट कामाला लागलो. सुकाणू नीट लावले अन् नांगर वर उचलू लागलो.

इतक्यात किनाऱ्यावर एक मोठा गदारोळ माजला , आरोळ्या-किंकाळ्या , बंदुकींचे आवाज... एकच सगळा गोंधळ.

सरदार म्हणाला , " बहुधा लढाई सुरू झाली असावी.. हा आवाज आपल्याच लोकांचा आहे... ते इकडेच पळताहेत ! चल घाई कर... नांगर खेच वर... "

सरदाराने आणि मी नेटाने वल्ही मारायला सुरवात केली सरदाराच्या दणकट हाताच्या पहिल्याच सपाट्यानं गलबत किनाऱ्याकडे झुकलं... पण लगेच सावरलं. गलबत सुळकन् खाडीतून बाहेर पडलं !

पाठीमागून लोकांच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. बहुधा आम्ही पळून चाललेलो त्यांच्या लक्षात आलं असावं पण लक्ष द्यायला सवडच नव्हती आम्हाला.

अनुकूल प्रवाह लागला होता. आमचे गलबत झपाट्याने पुढे निघाले होते. जर आम्हाला त्यांनी गाठले असते तर मरण खासच ठेवलेले होते! सरदारने एक धाडस केले. तोफेचे तोंड किनाऱ्याकडे केलेलेच होते. त्याने त्या तोफेला बत्ती दिली. एक आगीचा लोट उठला. धडामधूमऽऽ आवाज झाला अन मग सगळे शांत होऊन गेले!

● ● ●

# पंधरा

त्या दिवशी मला विलक्षण शारीरिक आणि मानसिक त्रास झाला होता. त्यावेळी अंगातली सर्व शक्ती, आपल्या सामर्थ्याची मी पराकाष्ठा केली होती. डोळ्यासमोर एकच ध्येय होते... सुटका!

मोकळ्या समुद्रावर आल्यावर मात्र गार वाऱ्याने माझे डोळे आपोआपच मिटू लागले होते. सरदारच मग म्हणाला, "पोरा आता झोप घे थोडीशी फार दमलायस... बरे वाटेल... मी बघतो ह्या आपल्या गलबताकडे!"

निश्चिंत मनाने मी झोपी गेलो.

सकाळी सूर्य बराच वर आल्यावरच मला जाग आली. सरदार कठड्याशी रेलून उभा होता. मजेत स्व:ताशीच शीळ घुमवीत मला उठलेले पाहताच माझ्याकडे पाहून हसला म्हणाला, "उठलास का? भूक लागली असेल ना? खालच्या कोठडीत जा तिथं रोट्या आणि फळांचा मुरांबा आहे."

माझा नास्ता झाला. वर येताना सरदारसाठीही थोडा नास्ता बरोबर आणला. नास्ता करता करता आम्ही गप्पा मारू लागलो.

"राघोजी, फार भयंकर होतं माझं

आयुष्य. लहान वयातच मी घर सोडलं; तेव्हापासून सारखी माझी अधोगतीच होत गेली! दहा-बारा वर्षे मी चाचेगिरी करतोय. पण मी आपखुषीनं हा धंदा स्वीकारला नाही हे मात्र खरं हं! या लोकांच्या त्रासाला-छळाला कंटाळून मी बेदरकार बनलो आणि झालो समुद्री डाकू-चाचा! त्या दिवसापासून माझे हात अनेकवेळा मानवी रक्तानं बरबटले गेले आहेत. तू अजून बच्चा आहेस. तुझं कोवळं मन थिजूनच जाईल! मी काय काय केलं हे जर... पण-- ते कशाला आता सांगत बसू? त्यात काही अर्थ नाही. माझा मार्ग ठरून गेलेला आहे."

"अगदी असंच काही नाही! आपण माझ्या मित्रांचा शोध घेऊ, आमच्या हिंदुस्थानात जाऊ; तुम्हाला नव्यानं आयुष्य सुरू करता येईल की!"

"बघू पुढचं पुढं-- पण आता सावध राहा वावटळ सुटणारसं वाटतयं, आहे चपळाई कर! ती शिडं सैल कर झटपट."

मी वर आभाळात पाहिलं खरोखरीच वादळ चिन्हे दिसू लागली होती. क्षितीज काळेकुट्ट झाले होते. सरदार सुकाणू घट्ट धरून उभा होता.

आणि बघता बघता वारा जहाजावर येऊन धडकला. एकदम जहाज खूप वर उचलल्यागत झाले. परंतु जहाज चांगलच मजबूत होतं; त्यानं त्या धडाक्याला चांगलंच तोंड दिलं आणि मग एखाद्या तुफान घोड्याप्रमाणं त्या उसळत्या लाटांवरून ते सणसणत पुढे निघालं. वर आकाश आता काळ्या मेघांनी दाटू लागलं आणि प्रचंड लाटा चहूकडे उसळू लागल्या. मी आवरलेल्या शीडांतून नि अवजारातून आता वारा जसा किंचाळत नि दोरखंड करकर वाजवीत नाचत सुटला होता. वाऱ्यानं एकदम दिशा पालटली आणि एका अजस्र उसळत्या लाटेनं दुकाठी एका बाजूला कलंडली. मी खाली कोसळतच होतो. सरदार मात्र भक्कम पाय रोवून उभा होता, हसत होता. म्हणाला, "बच्चा सांभाळ... पडशील!" मी सावरलो होतो. जवळजवळ दोन अडीच घटका दुकाठी अशी वाऱ्याच्या तुफान जोरापुढं लाटातून घुसत चालली होती. अखेरीस मग वावटळीचा जोर मंदावला आणि जहाज पूर्ववत् लाटांवर डोलत चालू लागलं.

त्यानंतर जवळजवळ आठवडाभर वारा चांगला आणि सतत वाहात असल्यामुळे आमचा प्रवास इच्छित दिशेने खूपच जलद होत होता. आम्ही निघतानाच प्रवासाच्या दिशेने नाळ धरली असल्यामुळे दिशा चुकण्याचा संभव नव्हता आणि जोडीला आता या जहाजावर होकायंत्र आणि प्रवासमार्गाचा एक नकाशाही सापडला होता, आमचं जहाज आमच्या बेटाच्या दिशेनं बरोबर जात होतं.

आमच्या जहाजानं आता व्यापारी वाऱ्यांच्या भागात प्रवेश केला होता. डोलकाठीच्या वरची टोकांची शीडं उभारणं आवश्यक होतं काम तसं अवघड होतं, पण सरदार आणि मी दोघांनी मिळून ते पार पाडलं! नंतर मुख्य शीड उभारलं. आता सतत सुकाणूजवळ थांबण्याची गरज नव्हती. आम्ही ते जवळच्या खांबाला बांधून टाकलं, त्यामुळे इतर कामे करणं जरा सोपं जाऊ लागलं होतं. पण सतत बांधून ठेऊन त्यावर विसंबून राहणंही काही अंशी धोक्याचं होतं, कारण वारा बदलताच जहाज कुठंतरी वाहात गेलं असतं.

अर्थात् समुद्रावर सदैव वादळाची धास्ती असतेच, परंतु आमच्या सुदैवाने तसला प्रसंग पुन्हा आला नाही. कुठलंही संकट न येता तेरा चौदा दिवस आमचा प्रवास सुखाचा आणि ठरलेल्या दिशेने पार पडला होता, आमच्या अंदाजाप्रमाणे आम्ही आमच्या बेटाच्या जवळजवळ येत चाललो होतो. आता पुन्हा मला माझे मित्र भेटणार, या एका विचारानेच माझं हृदय आनंदानं भरून येत होतं.

चौदाव्या दिवशी किंवा पंधराव्या दिवशी एक चमत्कार घडला. आमच्या जहाजाच्या डोलकाठीवर एक समुद्री-गरूड डौलात गिरकी घेत येऊन बसला अन् सरदाराने दाणकन माझ्या पाठीवर थाप मारली, मोठ्यामोठ्याने हसत मला विचारले-मी नकारार्थी मान हलवली," बच्चा ह्याचा अर्थ ध्यानात आला काय ? "

" वेडा आहेस अरे ... आता आपण किनाऱ्याच्या जवळपास आलो आहोत ; काय ? ... आणि त्या आनंदात त्याने आपल्या भसाड्या आवाजात एक आनंदगीतही गायला सुरवात केली. "

माझ्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. अखंड दिवस मी क्षितीजाकडे नजर लावून बसलो होतो... रात्र कशीबशी पार झाली. सूर्योदयापूर्वीपासूनच मी पुन्हा सुकाणूजवळ ठाण मांडले. नजर जमीन कधी दिसते यासाठी व्याकूळ झाली होती. सूर्योदय झाला, तिकडे काळसर ढगासारखे काहीतरी माझ्या नजरेस पडले. वादळ? हो, नि:संशय वादळ! मी कान देऊन लक्षपूर्वक ऐकत असताना, वाऱ्याचा आवाजही मला ऐकू आला. आमची धावपळ सुरू झाली. सूर्य अधिक वर आला. आणि आम्ही विस्फारीत नजरेने पाहातच राहिलो होतो; तो वादळाचा आवाज नव्हता आम्ही ज्या बेटावर राहात होतो, त्या किनाऱ्यावर उसळणाऱ्या त्या अजस्त्र लाटांची अविरत गर्जना! ते पर्वत शिखर! होय... मी पुन्हा आमच्या बेटाजवळ आलो होतो!

त्या सुंदर बेटाच्या दर्शनाने माझा आनंद मलाच आवरता येत नव्हता.

जगूजी, पिराजी पुन्हा भेटणार! होय; पण ते नक्की भेटू शकतील ना? की एखाद्या दुर्घटनेत त्यांचे काही बरे-वाईट... माझ्या मनात चरकल्यासारखे झाले. निर्धाराने माझ्या मनातले कुविचार मी दूर सारले आणि बेटावर उतरण्याची तयारी करू लागलो.

आता आमची पुरती तयारी झाली होती, ते बेटही आता अर्ध्या पाव कोसावर आलं होतं. खाडीच्या तोंडाशी येताच मी सुकाणू फिरवलं; दुकाठी मोठ्या डौलानं त्या खडकाला वळसा घालून पाणबागेच्या बाजूनं आमच्या घराच्या बरोबर समोर येऊन पोहोचली.

मी धावत पुढे आलो आणि नांगराची दोरी झटक्यात खोलून नांगर पाण्यात सोडला आणि तोफ डागली. त्या उंच पर्वतांच्या दऱ्यात झोपी गेलेल्या प्रतिध्वनींना गदागदा हालवीत धुडूमऽधडाड अशा गर्जनाने त्या निद्रिस्त वनश्रीला नि पर्वतराजाला मी सलामी दिली?

दुसऱ्याच क्षणी गुहेबाहेर उघडा-नागडा, आपले भेदरलेले डोळे– गलबताकडे क्षणभर रोखून मग झाडीकडे विलक्षण चपळाईने, भेदरल्यागत कोलमडत पळत सुटलेल्या पिराजीच्या धडाक्यापुढं, तो तोफेचा धडाका काहीच नव्हता! एक भेदरलेला दृष्टिक्षेप, एक किंकाळी नि लगेच झाडाकडे धूम पलायन, एखाद्या भेदरलेल्या डुकराच्या पोरागत तो पळत सुटला होता, त्याच्यापाठोपाठ जगूजीही झाडीकडे झेप घेत निघाला होता!

"ए!" आनंदाने वेडा होऊन मी ओरडत सुटलो, "पिराजी, जगूजी मी आहे.. मी.. राघोजी.. बारीकराव..."

माझे शब्द, माझा आवाज त्यांनी ऐकला असावा; ते दोघेही एकदम थांबले आणि माघारी वळले. पुन्हा एकदा मी हाक दिली. माझ्या आवाजाची ओळख पटताच ते माझ्याकडे सुसाट पळत सुटले. माझ्यानंही आता धीर धरवत नव्हता, मी झटक्यानं आपले कपडे काढून भिरकावले आणि तिकडे जगूजीने पाण्यात धडकावून उडी घेतली. जहाजावरून मीही पाण्यात सूर मारला, दुसऱ्याच क्षणी आम्ही तिघांनी पाण्यातच एकमेकांना घट्ट मिठ्या मारल्या. ह्या गोंधळात जेव्हा आमच्या पोटात खारट पाणी गेलं तेव्हाच आम्ही पाण्याबाहेर आलो. तोपर्यंत सरदारही खाली आला होता.

मी सरदारची– पिराजी, जगूजीची ऐकमेकांना ओळख करून दिली. सरदार म्हणाला, "या तुमच्या दोस्तानं तुमचं इतकं गुणगान केलंय की, न सांगता

पाहताही मी तुम्हाला ओळखू लागलो होतो."

आम्ही बेटावर आलो. पुन्हा एकदा मी माझ्या घरातून डोळे भरून पहात फेरफटका मारला. सरदारजीला सगळे बेट फिरून दाखवले गप्पा मारता मारता मी माझी हकिकत पिराजी आणि जगूजीला सांगितली आणि विचारले, "तुमची काय हकिकत ?"

जगूजी सांगू लागला, "हं! तू त्या दिवशी तसा गुफेबाहेर पडलास... आणि तू परत येण्याची आम्ही वाट पाहू लागलो. दोन घटका तरी गेल्या असतील तरी तू आला नाहीस मग आम्ही तुला मनसोक्त शिव्या द्यायला सुरवात केली आणि जेव्हा तीन घटका व्हायला आल्या त्यावेळी मात्र तुझी काळजी वाटू लागली कसाबसा धीर करून मी वर आलो पण तुझी काहीच चाहूल नाही लागली. मग हाकाही मारल्या आणि मग एकदम माझं लक्ष दूर जाणाऱ्या गलबताकडे गेलं वाटलं त्या चाच्यांनी तुला पकडून नेलं असावं... किंवा तुला ठार मारून इथंच कुठंतरी फेकून दिलं असावं त्या दूरवर जाणाऱ्या जहाजाकडे मी कितीतरी वेळ पाहात राहिलो होतो. अखेरीस ते दिसेनासं झालं तू दुरावलास म्हणून आम्ही अगदी मनमुराद रडलो."

"पण मला नक्की खात्री होती की तू परत येणार माझी मनोदेवता सांगत होती. तू संकटात आहेस, परंतु सुखरूप आहेस!"

"असो, आम्ही बाहेर आल्यावर तुझं प्रेत शोधायच्या मार्गाला लागलो, सारखा शोध घेत होतो. पण मनात सारखं वाटत होतं की, तुझं प्रेत सापडू नये, सगळं बेट, सगळा किनारा आम्ही पालथा घातला - पण... पण.. आता तू परत आलायस दोस्त आणि हे बेट पुन्हा आम्हाला नंदनवन वाटू लागलं आहे."

"आणि आता आपल्याकडे हे झकास गलबत आहे ह्या बेटाचा आता निरोप घ्यायला काही हरकत नाही" सरदार म्हणाला.

"अगदी मनातलं बोलालात सरदार, आता घराची फार फार आठवण यायला लागलीय"

मग एकदा निघायचं ठरल्यावर बेट सोडण्याच्या तयारीला आम्ही लागलो. जहाजावर पुरेसा अन्नसाठा होताच तरीही असावं आपलं म्हणून नारळ, भाकरीफळ, दिवली फळं वगैरेंचा भरपूर साठा जहाजावर चढवला.

निघायचा दिवस ठरला. पुन्हा एकदा संपूर्ण बेटभर भटकून आलो डोंगर,

नदी किनारे, वाळूचे किनारे, प्रवाळ बंधारे, भोकांचा खडक, पाणबाग... सगळं सगळं फिरून आलो.

शेवटी घरकुलातलं सगळे सामान, कुऱ्हाड, पेन्सिलीचा तुकडा, मासेमारीसाठी अंगठीपासून तयार केलेला गळ, फुटकी दुर्बिणं, मोडका चाकू, सुई असं, बेटावर उतरलो त्यावेळचं सामान एका बोचक्यात बांधले सरदार म्हणाला, "ह्याचं काय करणार ?"

"कशासाठी ?"

"आमचं आहे म्हणून-"

"माझं ऐका हे इथंच राहू देत आतल्या गुहेत नेऊन ठेवा; आपल्यासारखे दुसरे कोणी दुर्दैवी प्राणी ह्या बेटावर अडकून पडतील त्यांच्या उपयोगी येईल... होय की नाही ?"

"बरोबर आहे सरदार"

आम्ही ते सामान पुन्हा गुहेत नेऊन ठेवले. मग जगूजीनं एक नार लाकडाचा ओंडका आणला त्यावर जगूजी - पिराजी - राघोजी आणि सरदार हिंदुस्थानी. ही अक्षरे कोरली आणि तो ओंडका आमच्या घरकुलात नेऊन ठोकून टाकला. मग आमची होडीही तेथेच नेऊन ठेवली; मग मात्र एकदम गहिवरून आले. आता किनारा सोडायचा होता, पाऊल उचलवत नव्हते... पण... निघालो गलबतावर आलो. नांगर उचलला, मी पुन्हा एकदा तोफ डागून त्या आमच्या लाडक्या बेटाला अखेरची सलामी दिली.

आम्ही शीडं उभारलं, वारा बरा होता. जहाज हळूहळू पुढे सरकू लागलं! सूर्यास्ताचा समय होत होता आणि हळूहळू ते बेट आमच्या नजरेसमोर अंधूक होत, अदृश्य झालं! आम्ही अखेरचा सलाम केला.

जहाजाने गती घेतली होती.

जगूजी आणि पिराजीने गायला सुरवात केली होती...

"माझा हिंदुस्थान-"
"माय भूमी माझी-"
"सर्वाहूनी प्यारी!"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
2860
विषय



BVBK-0402860

या पुस्तकाबरोबर प्रकाशित झालेली
आमची इतर प्रकाशने

| | |
|---|---|
| • यशोवर्मन | संजय सोनवणी |
| • रासपूतीन | मदन पाटील |
| • आय लेड ट्रिपल लाईफ | फिल ब्रीक |
| • माय ट्रॅव्हल वूईथ | हेन्री |
| रोमान्सींग गर्ल | शेखूड |
| • रस सिध्दांत आणि सिध्दी | उमा दादेगावकर<br>पद्माकर दादेगावकर |
| • शि. म. परांजपे | डॉ निला पांढरे |